# जागर

## वार्षिक अंक

## २०२१–२२

## लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर

**ता. परतूर, जि. जालना**

* मुख्य मार्गदर्शक *

प्राचार्य डॉ. भारत खंदारे

* संपादक मंडळ *

प्रा. डॉ. अशोक पाठक
प्रा. बद्रीनारायण बिडवे
प्रा. दिलीप मनवर
प्रा. डॉ. अनिल कुलकर्णी
प्रा. डॉ. सखाराम टकले
प्रा. विजयानंद गंगावणे
प्रा. डॉ. शंकरराव तळेकर

या अंकात मांडलेली मते त्या त्या विद्यार्थ्यांची वैयक्तिक आहेत.
याला संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

* प्रकाशक *

लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर
ता. परतूर, जि. जालना

# अंतरंग


१. संपादकीय ०१

२. प्राचार्यांचे मनोगत

३. मराठी विभाग

४. हिंदी विभाग

५. इंग्रजी विभाग

६. वार्षिक अहवाल

- ✻ सांस्कृतिक विभाग
- ✻ ग्रंथालय विभाग
- ✻ क्रीडा विभाग
- ✻ मुक्त विद्यापीठ विभाग
- ✻ करियर कट्टा विभाग
- ✻ राष्ट्रीय सेवा योजना



# संपादकीय...

प्रिय रसिक वाचक, आमच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचा 'जागर' (कला, साहित्य, सांस्कृतिक) वार्षिकांक आपल्या हाती देताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आमच्या संस्थेचे सचिव मा. कपिल भैय्या आकात, उपाध्यक्ष मा. कुणालदादा आकात आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांनी आपल्या महाविद्यालयाचा वार्षिक अंक प्रकाशित व्हावा अशी सांस्कृतिक विभागाकडे इच्छा व्यक्त केली आणि त्यापोटी महाविद्यालयातील विद्यार्थी, लेखक, कवी, कलावंतांना तशी साद घातली. यामागचा हेतू हाच की, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपलं हक्काचं असं विचारपीठ उपलब्ध व्हावं. आम्ही केलेल्या आवाहनाला सर्वांनी खूप चांगला प्रतिसाद दिला, त्याबद्दल संपादक मंडळ सर्व लेखक कवींचे ऋणी आहे.

'जागर' या अंकात एकूण चार विभाग केलेले आहेत. त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी आणि महाविद्यालयात पार पडलेल्या सर्व कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे, 'जागर'मधील लेख, कविता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कला, गुणांची खरी ओळख करून देणारे आहेत. आपल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या निरिक्षणातून आणि प्रतिभेच्या सामर्थ्याने सामाजिक बांधिलकी, आपली संस्कृती, आपल्या कला, साहित्य यांच्याविषयी चांगला विचार करून लेखणीशी सुंदर अनुबंध जोडला आहे. महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग रा.से.यो. विभाग, क्रीडा विभाग, ग्रंथालय विभाग, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग, करियर कट्टा या सर्वांनी महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासासाठी आपले पहिले पाऊल पुढे टाकले आहे याची साक्ष अंकातील छायाचित्रे, व अहवाल यातून मिळेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

विशेष नमुद करण्यासारखी बाब म्हणजे 'जागर' वार्षिकांक प्रकाशित होण्यामागे आमचे प्रेरणास्थान संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती आशाबाई आकात, सचिव मा. कपिलभैय्या आकात, उपाध्यक्ष मा. कुणालदादा आकात, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. संपादक मंडळातील सर्व सदस्यांच्या सहकार्यामुळेच हा अंक आम्ही आपल्या हाती देऊ शकलो.

'जागर'साठी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष ज्यांचे सहकार्य लाभले, त्या सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार.

– संपादक मंडळ

# प्राचार्यांचे मनोगत




मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतूर संचलित लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय, परतूर 'जागर' वार्षिक अंक शैक्षणिक वर्ष २० ते २० चा संपादकीय मंडळ व विद्यार्थी रसिक यांच्या लिखाणातून तयार झाला आहे, याचा महाविद्यालयाचा प्राचार्य या नात्याने मनस्वी आनंद होत आहे. कारण महाविद्यालय हे विद्यार्थ्यांना परीक्षार्थी बनविण्याचे केंद्र नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात वाढ व्हावी, त्यांच्या अंगी असलेले कौशल्य विकसित व्हावे, यादृष्टीने नवोदित लेखक, कवी यांच्यासाठी मुक्त लिखाण करण्यासाठी वार्षिक अंक महत्त्वाचा आहे. यामधून विद्यार्थी मित्रांच्या मनात अनेक गोष्टी मुक्तपणे मांडण्यासाठी त्यांना वाव मिळतो. संपादक मंडळ विद्यार्थ्यांच्या लिखाणाची तपासणी करून मार्गदर्शक सूचना करतात. अनेक ज्वलंत प्रश्नाचा ऊहापोह या अंकात केला जातो. त्यामुळे सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाणीव विद्यार्थ्यांना होते.

जागतिकीकरणाच्या युगात सर्व क्षेत्रासोबतच शिक्षण क्षेत्रातही अनेक बदल होत आहे. आगामी काळात नवीन शैक्षणिक धोरण २०२० लागू होत आहे. यामध्ये अनेक बदल झाले आहेत. महाविद्यालय या बदलांना सामोरे जाण्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध करून देत आहे. त्यामध्ये तज्ज्ञ, अनुभवी प्राध्यावक वर्ग, अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी व संशोधनाच्या दृष्टीने अनेक बदल महाविद्यालयाने केले आहेत. सध्य स्थितीत महाविद्यालयात तीन संशोधन केंद्र (मराठी, अर्थशास्त्र, वाणिज्य) कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात वाढ व्हावी यादृष्टीने महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, करिअर कट्टा व विस्तार सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थांच्या सुप्त गुणांना वाव मिळत आहे.

हीच ऊर्जा घेऊन विद्यार्थी अनेक क्षेत्रांत ठसा उमटवीत आहेत.

अर्थातच या सर्व गोष्टींचे श्रेय स्व. बाबासाहेब (भाऊ) आकात आणि त्यांचाच वारसा जोपासण्याचे काम आता संस्थाध्यक्षा म्हणून श्रीमती आशाबाई आकात, कपिल भैया आकात व कुणाल दादा आकात यांच्याकडे जाते, हे याप्रसंगी सांगावे लागते.

**- प्राचार्य डॉ. भारत खंदारे**



# मराठी विभाग

✻ मार्गदर्शक ✻

प्रा. डॉ. अशोक पाठक

डॉ. सुधाकर बोथीकर

डॉ. रविंद्र गायके

प्रा. शरद बोराडे

✻ संपादक मंडळ ✻

अमोल आकात (बी. ए. तृतीय)

पवन मस्के (बीएस्सी द्वितीय)

योगेश वरकड (बी. ए. द्वितीय)

# असे का



अशाच एकदा रात्री
मी अंगणात बसली होते
दिवसभरातील विचार
मनात घोळवत होते.
तेवढ्यात नजर माझी
आकाशातील चांदण्यांकडे गेली
का नाही त्यांना कळली?
समानतेची शिकवण
मला त्याच वेळी समजली
मनुष्य स्वतःच्या सुखासाठी
दुसऱ्याला मात्र कनिष्ठ मानतो
चांदण्यांप्रमाणे एकत्र राहून
का नाही जगत तो
प्रेम देणे हाच धर्म
असे साने गुरूजी म्हणतात
तरीसुद्धा माणसे
जातीधर्मासाठी का झगडतात?
आजची माणसे ताऱ्यांप्रमाणे
अंधारात आहेत अडकलेली
समानतेने राहून
प्रकाश देण्याची महती
का नाही त्यांना कळली?

***

# अनंत तुझे उपकार आई

आहेत अनंत उपकार तुझे
माझ्या या जीवनावर
सहन करून वेदना दिलास मला
जन्म या भुतलावर

घेऊन माझा हात हाती
देऊन दिशा या विश्वाची
म्हणालीस घे भरारी उंच पाखरा
मनी बांधून गाठ सत्याची

सागराहून खूपच अधिक
दिलेस तू प्रेम मला
भरवून घास मायेचा
बळ दिलेस लढण्यास संकटाला

दिलेल्या तुझ्या संस्कारातून
घेतलेत धडे तुझ्या जीवनातून
सहाय्य करावे दिनांना
हाती त्यांच्या हात देऊन

घाबरले संकटात मी
राहिलीस खंबीर तू पाठीशी
त्यावर तू मिळव विजय
धैर्याने लढ म्हणालीस त्यांच्याशी



भाजलेल्या त्या हाताला
नाही विसणार गं मी
खाताना तुझ्या हातची पोळी
अश्रू येईल माझे नयनातूनी

कष्टाच्या त्या घामातून
दिलेस धडे ज्ञानाचे
देईन सुखाचे घास तुला
अनंत तुझ्या उपकाराचे

***

**धुमाळ अंजली विठ्ठलराव**
बी. ए. (प्रथम वर्ष)

# देश वाचवा



वाचवा ! वाचवा ! माझ्या देशाला रे वाचवा !
माझ्या देशाला रे वाचवा
तुझ्यासारखा तूच नेता
तु कुणाचा नाही दाता
आमदारांनी प्रचार करूनी
पिडलयं जनतेलाSSS
वाचवा ! वाचवा ! माझ्या देशाला रे वाचवा
माझ्या देशाला रे वाचवा ! ।।१।।


वेडा होऊन मतांसाठी
झेंडे - हँडबिल घेऊन हाती
वेळोवेळी सत्तेसाठी
बोलती वोट द्या
वाचवा ! वाचवा ! माझ्या देशाला रे वाचवा माझ्या
देशाला रे वाचवा ! ।।२।।

सत्तेसाठी गेला हरपून
जनतेलाही गेला विसरून घोटाळ्यांची मालिका तुझी
का मुळी संपेना
वाचवा ! वाचवा ! माझ्या देशाला रे वाचवा
माझ्या देशाला रे वाचवा ! ।।३।।

**- दीपक रामराव काळे**
बी.ए. द्वितीय वर्ष

***

# प्रेम म्हणजे



प्रेम म्हणजे सुंदर काव्य असते
प्रेम म्हणजे एक गोड नशा असते
प्रेम म्हणजे प्रेम असते
प्रेम म्हणजे डोळ्यांची भाषा असते
प्रेमात नसते जात-पात
प्रेमात नसतो भेदभाव
प्रेमात नसावा स्वार्थ
प्रेमात सुख दुःख वाटायचे असते
एकमेकांच्या चुकांना समजून घ्यायचे असते
प्रेमात थोडासा असावा दुरावा
कारण प्रेमाचा अर्थ कळावा
प्रेम म्हणजे एक शोभा नसते
प्रेम म्हणजे प्रेमच असते.

*** विचारधन ***

**भूक आहे तेवढे खाणे ही प्रकृती,
भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे ही विकृती
आणि वेळेप्रसंगी स्वतः उपाशी राहून
दुसऱ्याची भूक भागवणे ही संस्कृती...**

# समजू नकोस मला निर्भया...



समजू नकोस मला सीता
मिळावा तुझा सहवास
म्हणून भोगणार नाही वनवास
ऐकून काहीबाही
तू सोडशील मला वाऱ्यावर
करायला लावशील अग्निदिव्य
आणि तरीही तू कसा
मर्यादापुरुषोत्तम !

समजू नकोस मला द्रौपदी
मी नाही द्यूतात
लावण्याची बाजी
नाही करणार कृष्णाच्या धावा
निष्क्रियतेने वस्त्रहरण
बघेल सर्व दरबार
आणि तू मात्र धर्मराज
युधिष्ठिर !

समजू नको मला कुंती
घेणार नाही दुःख पदरात
लोकलज्जेस्तव
सोडणार नाही लेकराला प्रवाहात
महाराणीचे वैभव कर्णविना दीन
आणि तरीही तू मात्र
जगाला प्रकाश देणारा
सूर्यनारायण !

समजू नकोस मला गांधारी
त्यागून सारे राज्य
नाही राहणार अंधारी
राजमाता असून माझे उदास
आणि तू कसा रे तरीही
कौरवसम्राट !

समजू नकोस मला निर्भया
दाखवू नकोस पुन्हा पुन्हा दया
गप्प बसून बघतील मला जाताना
बळी मेल्यानंतर पडद्यावर उचलतील
तळी तरीही तुम्ही मात्र
पुरुषोत्तम !


आता संपली आहे दुविधा
होकार नकाराची
मी यजान जळणारी
होणार नाही समिधा

आयुष्याला कंटाळून
जवळ करणार नाही विहीर किंवा आड
आता नेम धरून जळती चिमणी पडणार नाही
फक्त माझ्या अंगावर द्वाड

भयमुक्त होऊन मी
स्वयंतेजाने पेटते आहे
मी आहे नव्या युगाची
स्वयंसिद्धा !

**- प्रल्हाद ज्ञानदेव राऊत**
बी.कॉम. प्रथम वर्ष

# जगाच्या पोशिंद्याची ही कहाणी



ही काळी माती
शेतकऱ्यांना जपणारी
सर्जा राजाची जोडी
शेत नांगरणारी
शेतकऱ्यांच्या प्रत्येक सुखदुःखात
नेहमी साथ देणारी

हिरवे रान शेतकऱ्यांना
आधार देणारे
तर मुकी जनावरे
शेतकऱ्यांना बोलणारे

घरापाशी येणाऱ्या गोरगरिबांना
कधी माघारी जाऊ न देणारी
सण उत्सव साजरा करून
आपली संस्कृती जोपासणारी

सरकार शेतकऱ्यांच्या घामाचा
भाव एका वर्षात वाढवणारी
तर चार वर्षात घटवणारी



पण शेतकऱ्यांची जात
खंबीरपणे उभी राहणारी
न खचता पुन्हा
लागवड करणारी

आपल्या कुटुंबांना नेहमी
सुखात ठेवणारी
तर जगाला चालवणारी!!!

**- चेतन हनुमानराव चिखले**
बी.एस्सी, द्वितीय वर्ष

# गर्भातील मुलीची व्यथा



ये आई ऐकलस का?
मला जगायचं आहे
सुंदर हे जग पाहायचं आहे
तुझ्या छकुलीसाठी थोडं धाडस करशील का?
मला तू जन्माला घालशील का?

नाही मी होणार हट्टी
ना करणार कधी दादाशी कट्टी
पण दादाबरोबर खेळण्यासाठी
खेळता-खेळता सूर्याची
कोवळी किरण झेलण्यासाठी
मला तू जन्म देशील का?

सांग ना आई मला तू जन्माला घालशील का ?

मला ही पहायची आहे
ही रंगीबेरंगी दुनिया
फुलपाखराच्या पंखावरील रंगाची किमया
जीवनात माझ्या रंग भरशील का?
मला तू जन्माला घालशील का?

नको मारू मला या गर्भाच्या अंधारात
मलाही पाहू दे नवी सोनेरी पहाट
मोठेपणी कल्पना बनून जाईन मी अंतराळात
स्त्री जातीच्या महिमा, सांगेन साऱ्या जगाला
पण आई तु माझं ऐकशील का?
मला तू जन्माला घालशील का?

आई
मी मुलगी म्हणून घाबरतेस
अन् नको तो विचार मनात आणतेस
आई, तू नको गं घाबरू
तू ही कधीतरी मुलगी होतीस
हे नको गं विसरू
जसा जन्म तुला दिला आजीनं
तसा तू ही मला जन्म दे
नाजूक तुझ्या कळीला जगण्याचा अधिकार दे
एकदा तरी माझं तू ऐकशील का?
मला तू जन्माला घालशील का?

आई
मला माहित आहे
सगळ्यांनाच शिवबा हवा आहे
पण लक्षात ठेव
शिवबालाही जिजाऊने घडवलं
म्हणूनच स्वराज्याचे निशाण
साता समुद्रापार फडकलं
शेवटची मी माझी विनवणी ऐकशील ना
मला तुझ्या कुशित थोडी जागा देशील का?
सांग ना ग आई ऐकशील का?
मला तु जन्माला घालशील का?

**- वैष्णवी पाटील**
बी.एस्सी, द्वितीय वर्ष

# जगात जर या माती नसती...



एक वृक्षही दिसला नसता
फुले न येथे फुलली असती
सुगंध येथे वसला नसता
जगांत जर या माती नसती...


धान्यही येथे पिकले नसते
वसली नसती मानव वस्ती
असला नसता पशु वा पक्षी
जगांत जर या माती नसती...

नद्या नि पर्वत दिसले नसते
घरे न येथे उभी ठाकती
दिसला नसता ताजमहाल
जगांत जर या माती नसती...

ऋण हे मोठे मानवावरी
शक्य न फिटणे जे कधीकाळी
आपण होऊन या मातीचा
टिळा लावितो मी मम भाळी...

***

# आठवण



जीवनाच्या वाटेवरती
स्वतःच्या धुंदीत आलीस
आलीस ती आलीस
माझ्यासमोर आलीस
हृदयाच्या पटलावरती
प्रेमळ स्मृती ठेवू लागलीस
ना नात्याची ना गोत्याची
तरीही मनाला हुरहुर लावलीस
हुरहूर लावलीस ती लावलीस
नंतर का टाळायला लागतीस
वर टाळलीस ती टाळलीस
पण दूर का गेलीस
पुन्हा एकदा आयुष्यात आलीस
तेव्हासुद्धा तितकीच आवडलीस
मला पाहून मस्तच हसलीस
पुन्हा जगायला भाग पाडलीस
किती चांगली स्वप्ने दाखवलीस
छोट्या चूकीची अवघड शिक्षा दिलीस
स्वप्न तोडून सोडून का चाललीस
आणि जाताना मात्र तू माझी वाट लावलीस.

***

**नम्रता वोवळे**
बी.एस्सी, प्रथम वर्ष

# समज-गैरसमज



तोंडावर ताबा न राहल्याने
समोरचा व्यक्ती वैरी होऊन जातो
या गैरसमजामुळे माणसाचं
नातं असंच संपून जातं

दुसऱ्यावर शंका घेण्यात
आयुष्य निघून जातं
या गैरसमजाच्या नादात
कुठं तरी काही तरी राहून जातं

बघण्याचा दृष्टीकोन बदलला की
माणसाचं कोडं सहज सुटून जातं
असंच मग नकळत जीवनात
प्रत्येकाचं सारं बदलून जातं

छोट्या छोट्या कारणाने
व्यक्ती एकमेकासंग भांडतं
हाच विषय सर्वांसोबत
मोठा करून मांडतं

याचा परिणाम म्हणून
खूप सारं घडतं यामुळेच
सख्खं नाते देखील तुटतं

वाटतं माझ्या सोबतच
का हा व्यक्ती असा वागतो
पण परिस्थितीनुसार
त्याला तसं वागावं लागतं
गैरसमजाचा भावनेत
तो तसाच जगतो

बोलता बोलता
सहज बोलून जातो आपण
सर्व काही शब्दात राहून जातं
दुर्देवाने खुप काही मनात
गैरसमजामुळे तुटून जातं नातं क्षणात

तरी पण बरंच असतं
काही दडलेलं मनात
मनमोकळं न बोलण्याने
तसंच राहतं त्याच्या जीवनात

कुठे तरी माणूस
दोन चांगल्या शब्दाचा
भुकेला असतो
आपल्या माणसाकडून
आपलं म्हणून बोलण्याच्या
प्रतिक्षेत असतो...

**- चेतन लक्ष्मीबाई हनुमानराव चिखले**

# प्रवास

मला नाही जमणार असं
किती दिवस म्हणायचे
प्रयत्न करत राहायचे
आणि कामाला लागायचे
आयुष्याच्या प्रवासात आता असेच जगायचे...

हार जीत तर होत असते पण
हारता हारता आता जिंकायचे
अनुभवातून धडा शिकत
यशाकडे जायचे
आयुष्याच्या प्रवासात आता असेच जगायचे...

कोण काय म्हणतंय
याकडे लक्ष नाही द्यायचे
आपल्या कामात आपण
नेहमी व्यस्त राहायचे
आयुष्याच्या प्रवासात आता असेच जगायचे...

चालताना ठेच लागली तर
स्वतःच स्वतःला सावरायचे
दुसरे पाऊल टाकताना
पूर्ण तयारीने टाकायचे
आयुष्याच्या प्रवासात आता असेच जगायचे...

यशाचा दिशेने आता धावायचे
नाही आले धावता तर चालायचे
चालता पण नाही आले तर रांगायचे
पण नेहमी सातत्य ठेवायचे
आयुष्याच्या प्रवासात आता असेच जगायचे...

**- चेतन लक्ष्मीबाई हनुमानराव चिखले**


# थंडी



उंदरानं वाजवली पुंगी
हत्तीची सुटली लुंगी
कोल्हा म्हणाला पळा पळा
जंगलात आली थंडी
थंडीने सगळे हुडहुडले
घाबरून प्राणी भेदरले
नाना युक्त्या करू लागले
सशाची कल्पना सर्वांना पटली
शेकोटी करण्याची युक्ती ठरली
शेकोटीला आणला पाला पाचोळा
शेकोटी भोवती सगळे झाले गोळा
अस्वलानं आणली आगपेटी
सिंहानं पेटवली मजेत शेकोटी
बघता बघता पळाली थंडी
सर्वांना मिळाली आनंदाची हंडी...

**- रोहित मोहन हिवाळे**
बारावी

# पोलीस आणि डॉक्टर



लोकांना वाचवणं घरच्यांना सावरणं
आव्हानांना स्वीकारणं
या जबाबदाऱ्या पार पाडणं

विनाकारण फिरणाऱ्यांना
नाईलाजाने मारणं
लोकापर्यंत लस पुरवणं
देशाला चालवणं
हे कर्तव्य निभावणं

स्वतःचा जिव पणाला लावणं
दुसऱ्याचा जिव वाचवणं
आता तरी लोकांनी
सहकार्य करणं
एवढंच आमचं सागणं

राज्याचं फक्त एकच मागणं
जनतेला फक्त एकच मागणं
घराच्या बाहेर विनाकारण
न पडणं...

**- चेतन हनुमानराव चिखले**

***

# मावळता सूर्यास्त



मावळता सूर्यास्त बरेच काही सांगून जातो आपल्याला. असणाऱ्या गोष्टी, आपली माणसं, आपल्या आवडीच्या सगळ्याच गोष्टी आपण घट्ट पकडून ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. कारण आपल्यापासून त्या गोष्टी लांब जाण्याची, गमावण्याची भीती जास्त वाटते. ह्या असणाऱ्या सगळ्या गोष्टी माणसाला मिळत गेल्या ना की नकार अपयशास समोर जाणं, अपमान, तिरस्कार, मनाविरुद्ध घडणाऱ्या सगळ्या गोष्टीचा राग यायला लागतो. सुबुध्दी जागी होते ती फक्त हवी असणारी गोष्ट मिळवण्यासाठी; पण आपल्याला हव्या असणाऱ्या गोष्टी मिळवण्याच्या हव्यासात सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या होत नाहीत!! तुम्ही आयुष्यात कधीच कोणत्या व्यक्तीला तुमच्यावर प्रेम करण्यासाठी, मैत्री करण्यासाठी, नातं जोडण्यासाठी जबरदस्ती करू शकत नाही. कारण प्रत्येकाचा दृष्टीकोन, समज त्याच्या परीने योग्य असतो. त्रास फक्त आपल्याला होतो, कारण आपण त्यात जास्त अडकून राहतो. त्यामुळे एखाद्या नात्यात किंवा वस्तूमध्ये किती पण अडकलात तरी त्या नात्याचा आणि वस्तूचा शेवट कधी तरी होणार हा विचार नेहमी लक्षात ठेवा म्हणजे यातना कमी होतील.
आणि म्हणून उगवत्या सूर्यापेक्षा मावळतीचा सूर्य मला जास्त आवडतो कारण तो बरेच काही शिकवून जातो!

**- शंकर भरत खोसे**

# तुझ्याविना

करतो प्रयत्न तुझ्या विना
पण मन काही मानेना
मन म्हणते माझे वारंवार
बोलत रहावे तिच्याशी बारबार
पण रुसली आहे माझी मैना
खूप खूप होतीय माझी दैना
केले प्रयत्न मनवण्यासाठी कित्येक
नाही मानले तिने एक-एक

स्मित केले हास्य तिच्या मुखाकडे
तिने सुद्धा लाजत बघितले माझ्याकडे
अलगद प्रेमाचा दिला आलिंगन
दिला प्रेमाचा भाळावर चुंबन
म्हणालो तिला असेच जगुया जीवन
करू एकमेंकाचे वृद्धीकाळी जतन.

***

# शब्द

नाही व्यक्त होऊ शकत शब्दात
भावना प्रकट करतो अर्थरूपी काव्यात
झाल्या असतील माझ्याकडून चूका
त्यास आपण द्यावे एक संधीचा मौका
वाटते सरळ शब्दाने बोलावे
घाबरतो याच शब्दाने नाते दूर न वहावे
मागणे माझे एकच अदृश्यरुपी देवाला
सदा हसत घर ठेव हर एक संकटला

***

# एकटाच

मी एकटाच दिसतो
राहतो मी माणसाच्या गर्दीत
चालतो मी अनंत रस्तात
पळतो मी धावणाऱ्या माणसासोबत
बोलतो मी स्वार्थाच्या भरभराटल्या दुनियेत
तरी मी एकटाच दिसतो

आहे मज सुख-दुःख
आहे मज तहान-भूख
मज जाणवते थंडी-ऊन
तरी मी एकटाच दिसतो

मज भरपूर नाते-गोते
मज आहे संपन्न परिवार
त्यात मी मला अर्धवट दिसतो
आहे माझे जीवा-भावाचे भरपूर मित्र
त्यात मी मला पूर्ण पहातो.

***

# घे रे

घे रे  घे रे घे  मोकळा श्वास घे रे
जातील संकटाचे
येतील सुखाचे क्षण रे
वाटते तुला तू ते कर रे
स्वतःचे मन मारत नको जगू रे
आहे तुझ्याजवळ माणसे प्रेमाचे रे
त्यास तू नको दुरावा देऊ रे
अस्थिर झालेल्या मनाचे बोल बोल रे
आनंदात राहून आनंद सर्वांना दे रे
घे रे  घे रे  घे रे मोकळा श्वास...

**- प्रा. अमोल काळे**
रसायनशास्त्र विभाग

# रान



पडलं सपान जाऊ जोडीन काम गोडीन पाहु रानी
मिरगाच्या तोंडी कशा पावसाच्या सरी येती
यंदा लावीन यंदा पेरीन पिक मोती
बी टी च्या भावाचा लय भारी याला घोर
आनीन मनत्यात समदीच याची पोर
डब्बा आनीला समदा लाविला रानामंदी
पाऊस पडतो कापुस वाढतो रानामंदी
त्याला सारी मनत्यात कशाचंही नाही भेव
पांढऱ्या या सोन्याला लय भारी हाय भाव
कापूस वाढून रान झालं हिरवं गारं
त्याला हो पात्याचा लय भारी आला बार
पात वाढत बोंड घडत पानो पानी
दसऱ्यात त्याच्यावर लाल्यानी केला घाला
संगतीला त्याच्या मावा-करपा हो आला
समदं सारं सोसून त्यानं उभा माल केला
तेवढ्यात शासनाचा आदेश जारी झाला
मनतुया घेईन हमी भावानं मी कापसाला
एवढं करून एवढं सरून त्याला हाती काय आलं?
त्याच्या हो डोक्यावर पाटलाचं कर्ज झालं
पडलं सपान जाऊ जोडीन काम गोडीन पाहु रानी...

***

# सपान

शेतकरी राजाला सपान पडलं
सपनात त्याच्या अघटीत घडलं
शेतकऱ्याची दिसली नुसतीच धडपड
बाजूला दिसली लय भारी गडबड

सत्याचा कुठं लागना थारा
असत्याला इथं मिळाला वारा
शेतकरी राजाला सपान पडलं
सपनात त्याच्या अघटीत घडलं...

कापसाच्या सरकीचे पाकीट कमी झाले
चारशे ग्रामचे पाकीट आले
बी. टी. नुसती नावाची झाली
शेतकरी राजाला सपान पडलं
सपनात त्याच्या अघटीत घडलं...

पावसानं केला नुसताच काला
समदाच कापुस वाहून गेला
सकाळी उठून वावरात गेला
समदाच मळा वाहुन गेला
शेतकरी राजाला सपान पडलं
सपनात त्याच्या अघटीत घडलं...



**प्रा. डॉ. डी. यु. थोंबाळ**
रसायनशास्त्र विभाग

# ग्रामीण जीवनातील समस्या

एकविसाव्या शतकात आपल्या भारतापुढे ज्या अनेक समस्या आहेत त्यापैकी एक समस्या म्हणजे आपल्या देशातील शहरे फुगली आहेत आणि खेडी ओस पडली आहेत. असे का? या प्रश्नाचे उत्तर आजच्या ग्रामीण जीवनातील समस्यांत दडलेले आहे.

खेड्यांत उपासमार झाली की कुटुंबेच्या कुटुंबे शहराकडे धावू लागतात. मुंबईत रस्त्यांवर घाणीत राहणाऱ्या या मंडळींना आपण जर का विचारले की तुमचे गाव सोडून तुम्ही या मुंबईत का येता, तर ते सांगतात, मुंबई कशीही असली तरी ती पोटाला दोन घास देते. कष्ट करणाऱ्याला येथे काम मिळते आणि कसे का होईना आम्ही जगू शकतो. त्यामुळे खेड्यांतील मोकळे वातावरण सोडून ते या प्रदूषित शहरांकडे धावतात,

आपला देश स्वतंत्र होऊन साठ वर्षे झाली तरी भारतातील खेड्यांतून काही सुधारणा झाली नाही. उलट दिवसेंदिवस खेड्यांची स्थिती दयनीय झाली आहे. आपण आजही अभिमानाने सांगतो की भारत हा खेड्यांचा देश आहे. पण या खेड्यांसाठी आपण काय केले? काही नाही.

भारताच्या राष्ट्रपित्याने स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्याला ही जाणीव करून दिली होती. बापूजींनी तरुणांना आदेश दिला होता, खेड्याकडे चला. इतक्या पंचवार्षिक योजना आखल्या गेल्या. तरीपण आजही कित्येक खेड्यांत रस्ते नाहीत. पावसाळ्याच्या दिवसांत या खेड्यांचा इतर प्रदेशांशी असलेला संबंध तुटतो. उन्हाळ्यात कित्येत खेड्यांत पाण्याचा टिपूस राहत नाही. टँकरने तेथे पाणी पाठवावे लागते. खेड्यापाड्यातील सारी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. लहरी पाऊस कधी जास्त पडतो कधी कमी पडतो. तर कधी अवेळी पडतो. त्यामुळे शेतकरी कायमच हवालदिल होतात कृषी क्षेत्रात इतके नवे शोध लागले आहेत, नवीन अवजारे आली आहेत पण ती खेडोपाडी पोहोचत नाहीत.

आपल्या देशातील शेतीचा दुसरा एक रोग म्हणजेच कौटूंबिक भांडणांतून शेतीचे होणारे तुकडे. त्यामुळे लहान शेतकऱ्याकडे शेतीचा एवढा लहान तुकडा येतो की, ती जमीन त्याच्या कुटुंबालाही पुरेशी नसते. मग ती कोणाला तरी कसायला देऊन तो शहराकडे नोकरी, कामासाठी धाव घेतो. दुसऱ्यांच्या शेतात खपणाऱ्या शेतमजुरांची तर विलक्षण पिळवणूक होते. खेड्यांतून शेतीला पूरक असे इतर व्यवसायही नसतात. कुक्कुटपालन, मेंढीपालन, दुग्धव्यवसाय करणारेही दलालांकडून लुटले जात असतात.

भारत देश स्वतंत्र होऊनही खेड्यांचा तेथील ग्रामीण उद्योगांचा जसा योजनाबद्ध विकास व्हायला हवा होता तसा झालेला नाही. आरोग्य, शिक्षण आणि वाहतूक या गोष्टी खेड्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. ग्रामीण जनता अशिशिक्षतच राहिली आहे. अज्ञानामुळे तेथे काही प्रमाणात अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. त्यांतून कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता निर्माण होते. काही ठिकाणी गावातील काही सत्ताधीश धनाढ्य व्यक्ती इतरांवर जुलूम करतात.

अशा वेळी महात्मा गांधीजींची शिकवण आठवते. ते सांगत की, आपल्या देशात मोठमोठे कारखाने आवश्यक नाहीत. त्याऐवजी खेड्यांतील घरांतून उद्योगधंदे सुरु करा म्हणजे खेड्यातील माणूस खेड्यातच राहिल आणि खेडी स्वयंपूर्ण होतील. एक गोष्ट नक्की की खेडी सुधारली, विकसित झाली तरच देशाचा विकास होईल.

**- देविदास अनंतराव आकात**
बीएससी द्वितीय वर्ष

# कर्मयोगी संत गाडगे बाबा



जनतेला निर्मळ माणुसकीचा नवा आकार, विचार, धर्म शिकवणारा साधू म्हणा, संत म्हणा किंवा महात्मा म्हणा, काया वाटेल ते नाव द्या. असा होणे नाही, असे प्रबोधनकार ठाकरे म्हणायचे. विसाव्या शतकातील हा महापुरुष ज्यांनी सर्व महाराष्ट्रात खेडोपाडी जाऊन अंधश्रद्धा, स्वच्छता, शिक्षणाचे महत्त्व, व्यसनमुक्ती अशा महत्त्वाच्या विषयांवर लोकांना जागृत करण्याचा विडाच उचलला होता. आपल्या जीवनाची ५० वर्षे त्यांनी समाजासाठी प्राण पणाला लावले. अशा या थोर संताबद्दल काही सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

बाबांचे नाव डेबुजी झिंगराजी जाणोरकर. विदर्भातील शेणगाव या गावी त्यांचा जन्म झाला. वडिलांचे छत्र लहानपणीच हरवल्यामुळे त्यांचे बालपण हलाखीतच गेले. वडील गेल्यानंतर आई सखुबाई त्यांच्या माहेरी बाबांच्या मामाच्या आश्रयाला जाऊन राहू लागल्या. येथेच बाबा, मामा चंद्रभानजी यांना शेतकामात मदम करू लागले व त्यांचे बुराखी जीवन सुरू झाले. गुरे सांभाळत असताना सवंगड्यांसोबत पोहणे, वेगवेगळे खेळ खेळण, भजन गाणे इत्यादी गोष्टींत त्यांचा बालपण घडत गेले. १४-१५ वर्षांचा डेबूजी शेतकरी बनला. शेत नांगरणे, पेरणे इत्यादी कामांबरोबर बैलांची निगा राखणे हे काम तो आवडीने करत असे. शेताची सर्व कामे आता चंद्रभानजी मामाने डेबूजीवर सोपवू लागला.

५० एकर जमीन सावकाराकडे गहाण ठेवली. संसारात ओढाताण होऊ लागली. सावका जमिनीवर हक्क सांगू लाला. डेबूजीने सावकारास कडाडून विरोध केला; परंतु तितकासा परिणाम झाला नाही. मामाची जमीन सावकाराच्या ताब्यात गेली. या सर्व गोष्टीचा परिणाम डेबूजीवर झाला. समाजावर होणाऱ्या अन्यायाची चिड निर्माण झाली. समाजाला होणाऱ्या अनेक प्रकारचा जाच डेबूजी पहात होते. यातून बाहेर पडणे आवश्यक आहे, असे वाटून बाबांनी लोकसेवेचा प्रारंभ केला. लोकसेवेचे व्रत घरी राहून होणार नाही म्हणून बाबांनी १ फेब्रुवारी १९०५ ला घर सोडले आणि बाबांचे समाजसेवेचे काम सुरू झाले. बाबांनी प्रथमतः षड्रिपूंचे दमन केले. स्वतःच्या देहमानाचा चोळामोळा केला.

महाराष्ट्रातील खेडोपाडी जाऊन दिवसा गावाची स्वच्छता करणे आणि रात्री कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करणे हा दिनक्रम बाबांचा असायचा. उदरनिर्वाहाचा प्रश्नच येऊ दिला नाही. मिळेल ते

अन्न खाऊन बाबा आपली उपजीविका भागवत असत.

बाबा कीर्तनात अंधश्रद्धेवर कडाडून टीका करत. अंधश्रद्धेमुळे समाजाची किती हानी होते. हे ते पटवून देत त्यांच्या कीर्तनात कबीरचे दोहे, तुकारामाचे अभंग या बाबींचा मोठ्या प्रमाणात भर असे.

जत्रा में फतरा । तिरथ बनाया पाणी ।।
दुनिया भई दिवाणी । पैसे की धुळधाणी ।।

या कबिराच्या दोह्यातून लोकांना अशा ठिकाणी तुमची लूट केली जाते, हे पटवून देण्याचा प्रयत्न करत असत. जादूटोणा, चमत्कार या गोष्टीच्या आहारी जाऊ नका. या सर्व गोष्टी थोतांड आहे. हे अगदी तळमळीने लोकांच्या गळी उतरण्याचा खटाटोप बाबा करत असत. त्यांचा ना मंत्र ना गुरूपदेश.

बाबांनी आपल्या ५० वर्षांच्या कारकिर्दीत अनेक धर्मशाळा, गोरक्षण संस्था, बोर्डिंग बांधले. समाजाकडून मिळणाऱ्या पैशाचा काटेकोर उपयोग करून या वास्तू त्यांनी उभारल्या. त्या वास्तूमध्ये मूर्तिजापूर गोरक्षण संस्था, धर्मशाळा १९०८ मध्ये पूर्ण केली. त्याकाळी त्यासाठी १ लाख खर्च लागला. तसेच १९२० मध्ये पंढरपूर मराठा धर्मशाळाचे बांधकाम पूर्ण केले. त्याकरिता २ लाख खर्च करण्यात आला. अशा अनेक संस्था त्यांनी निर्माण केल्या. शिक्षण संस्थांनाही ते मदत समाजमाध्यमातून करत असे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सहवासात ते रमत. एका ठिकाणी न थांबणारा हा अवलिया कर्मवीर अण्णा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सान्निध्यात मात्र ते काही दिवस राहत असते.

बाबांचे कीर्तन चालू होते. चालू किर्तनात त्यांना कोणीतरी तुमचा मुलगा वारला असा निरोप दिला. कीर्तन न थांवता बाबा म्हणाले, ‘‘मेले ऐसे कोट्यानी कोटी, काय रडू एकासाठी.’’

बाबा आपल्या जीवनात एकदा रडले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर. जगाचा कैवारी गेला, अशी श्रद्धांजली वाहून अन्नत्याग केला आणि डॉ. बाबासाहेबांनर १४ दिवसांनी बाबांनी जगाचा निरोप घेतला.

**- प्रा. यशवंत दुबाले**
वाणिज्य विभाग, ला. ब. शा. महा., परतूर

# गुरू-शिष्य

गुरूच्या चरणी मिळे
भविष्य जगण्याचे तंत्र
गुरू चे विचार हे शिष्याला
मिळालेले कानमंत्र
चुकीची शिक्षा
सत्याची परीक्षा
ज्ञानाची भिक्षा
मिळविण्यासाठी करावी लागते
गुरूंची प्रतीक्षा
गुरू शिष्याचे नाते
कालांतराने जोडले जाते
त्यांच्या नात्यातील ओळख
अव्यक्त शब्दांनी मांडली जाते
गुरूची ओळख होते
त्रिदेवांच्या रूपाने
त्रिदेवांचे दर्शन घडते
गुरूच्या स्वरूपाने
गुरूच्या चरणी मिळे
अनेक संकटांना सामोरे
जाण्याचे धैर्य
म्हणून तरूण पिढ्यांनी
घडवले विशाल असे शौर्य

**- जयश्री कुचेकर**
१२ वी कला

# मराठवाडी बोलीतील शब्द



१) मव - माझं
२) तुव - तुझं
३) कामून - का बरं
४) ईथरोक - ईथपर्यंत
५) वले - लवकर
६) लिव्ह - लिहिणे
७) कोर्ड्यास - रस्सा भाजी
८) भगुणं - पातेलं
९) चिच्चा - चिंचा
१०) चिंचुक - चिंचेच्या बिया
११) वगारू - म्हशीचं पिल्लू
१२) पिटीव - पेटव
१३) खोबरेल त्याल - नारळ तेल
१४) घासलेट - रॉकेल
१५) म्या - मी
१६) च्या - चहा
१७) पवे - पोहे
१८) ईस्कुट - खेळखंडोबा
१९) वज्ज - ओझे
२०) गबस - गप्प बस
२१) कानवला - करंजी
२२) आगुदर - आधी
२३) वाढूळ - बराच वेळ
२४) कळवंडणे - भांडणे
२५) निवद - नैवेद्य
२६) गुळमट - गोड
२७) हान - मार
२८) फाटा - फांदी
२९) कडंकडंन सूट - परत जा
३०) बकीट - बादली
३१) टक्कुरं - डोकं
३२) फडा - झाडू
३३) बसल्या बैठकीला - ताबडतोब, लगेच
३४) वळका बघू - ओळखा पाहू
३५) डोक्यात काय येईना - आठवेना
३६) रगत - रक्त
३७) बारक्या - छोट्या
३८) यडगळ - वेडपट
३९) कुटं होतास - कोठे होतास
४०) वाइच - थोडं
४१) आंग तिथं - हा तिथे
४२) यदुळा - या वेळेस
४३) लय - खूप
४४) आईतवार - रविवार
४५) सुक्कीरवार - शुक्रवार
४६) हिंत - इथे
४७) फुपुटा - धूळ
४८) ट्याक्टर - ट्रॅक्टर

**प्रा. डॉ. देविदास उत्तमराव थोंबळ**
रसायनशास्त्र विभाग

# खेड्याकडे चला



कोरोना जगासमोरील अभूतपूर्व संकट आहे. या संकटावर मात करावयाची असेल तर ही सामूहिक जबाबदारी आहे. लस शोधण्याचे काम चालू आहे; पण खबरदारी घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाची अस्तित्व टिकवण्याची धडपड चालू आहे. तसेच इतरांशी कसे वागावे, याचा धडा मिळाला. हा धडा पुढील जीवनात नक्कीच उपयोगी ठरेल. या परिस्थितीत सरकारची भूमिका महत्त्वाची आहे. सरकारी व्यवस्थेतील क्षमता यामुळे जगासमोर आली. सरकारी व्यवस्थेतील पोलिस यंत्रणा, आरोग्य कर्मचारी, प्रशासकीय कर्मचारी हे प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडत आहेत. त्यांचे जितके आभार मानावे तितके कमी आहे. तसेच समाजसेवा संस्था, समाजसेवक यांचीही भूमिका महत्त्वाची असलेली दिसून येते. यांच्या भूमिकेमुळे अनेकांना मदतच झाली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भारताची परिस्थिती जगातील अनेक देशांच्या तुलनेत बरीच आहे, असे म्हणता येईल. अमेरिकेसारख्या महासत्ता या संकटामुळे हतबल झाली आहे. कोरोनावर नियंत्रण मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न जगातील सर्वच राष्ट्रांचा चालू आहे; परंतु त्रुवर कधी यश मिळेल हे अनिश्चित आहे. म्हणून अस्तित्वात असलेल्या परिस्थितीत जगण्याची सवय लावणे आवश्यक झालेले आहे.

कोरोना व्हायरसच्या प्रसाराची शृंखला खंडित करण्यासाठी भारतामध्ये लॉकडाऊन जाहीर करण्यात आले. सुरुवातीचे काही दिवस सुरळीत गेले; परंतु देशातील लॉकडाऊनचा कालावधी जसजसा वाढत जाऊ लागला तसतसे कामगार वर्गाचे हाल होऊ लागले. काम बंद उत्पन्न बंद या स्थितीमुळे खाण्यापिण्याचे प्रश्न निर्माण झाले आणि स्थलांतरित मजूर वर्ग आपल्या मूळगावाकडे मिळेल त्या साधनाने जाऊ लागला. सार्वजनिक वाहतूक बंद असल्यामुळे अनेक मजुरांनी पायी मार्गाचा अवलंब केला. त्यामुळे प्रवासात त्यांचे अतोनात हाल झाले. त्यानंतर शासनाला जाग आली आणि मजुरांना त्यांच्या राज्यामध्ये सोडण्यासाठी विशेष गाड्या सोडण्यात आल्या; परंतु तोपर्यंत अनेक मजुरांना आपले प्राण गमवावे लागले.

कोरोना महामारीवर लवकर नियंत्रण न आल्यास जगासमोर अनेक समस्या निर्माण होतील. जागतिक व्यापार, पर्यटन, दळणवळण इत्यादी बाबींवर अनिष्ट परिणाम होईल. त्यामुळे अनेक देशांतील अर्थव्यवस्था व सामाजिक स्थिती अतिशय दयनीय होईल व त्यामध्ये सुधारणा होण्यासाठी बराच कालावधी लागू शकतो.

भारतासमोरील अनेक समस्यांपैकी आज बेरोजगारीची भीषण समस्या निर्माण झालेली आहे. अनेक उद्योगधंदे बंद पडलेले आहेत. लाखो मजूर शहर सोडून आपल्या गावी गेले आहेत, त्यांना त्या ठिकाणी कामधंदे उपलब्ध नाहीत. उपासमारीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासकीय पातळीवरून वेगवेगळ्या मार्गाने मदत होत असली तरी ती पुरेशी नाही. ग्रामीण भागात काम उपलब्ध करून देणे लगेच शक्य नाही.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी स्थानिक उत्पादन आणि वितरण या गोष्टीवर भर देण्याचे आवाहन केले आहे. देशातील सर्वात महत्त्वाची समस्या



रोजगार आहे. रोजगार मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक जण शहरात जातात. शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील सोयी-सुविधा पुरवत असताना प्रशासनावर ताण वाढतो. परिणामी शहरातील अपुऱ्या सुविधांमुळे वसाहतीत स्वच्छता, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा इत्यादी बाबी व्यवस्थित पूर्ण होत नसल्यामुळे वसाहतीत घाणीचे साम्राज्य, रोगराई, पाण्याची मारामार या बाबी निदर्शनास येतात. म्हणून ग्रामीण पातळीवर रोजगार निर्माण व्हावा, असा प्रयत्न झाल्यास शहरीकरणास आळा बसेल; परंतु भारतीय लोकप्रतिनिधी या बाबींसाठी विशेष लक्ष देत नसल्याचे दिसून येते.

महात्मा गांधी म्हणाले होते की, खेड्यांचा विकास झाला तर भारताचा विकास आपोआप होईल; परंतु आजतागायत या गोष्टीकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार, पाण्याची सुविधा अशा बाबींवर जाणिवपूर्वक लक्ष दिले तर जे शहरीकरण किंवा केंद्रीकरण होत आहे त्यावर नियंत्रण येईल. आज खेड्यातील शेतकरीसुद्धा आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकरिता आसपासच्या शहरात जाऊन राहात आहे. त्यामुळे तो शेतापासून दूर राहत असल्यामुळे शेतीकामाकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होत आहे, परिणामी उत्पादकतेत घट होते.

खेड्यांचा संपूर्ण विकास करायचा असेल तर प्रथम तेथे शिक्षण दर्जेदार मिळेल, याची व्यवस्था करावी लागेल. प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून शासन जि. प. च्या माध्यमातून प्रत्येक खेड्यांत शाळा चालवत आहे; परंतु माध्यमिक शिक्षणाबाबतीत तितकीशी सुविधा असलेली दिसून येत नाही. म्हणून समाजातील सर्वच घटकांना ते मिळविण्यासाठी इतरत्र जाणे शक्य होत नाही. प्रथम या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात खाजगी संस्थेच्या माध्यमातून माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा काही प्रमाणात आहेत; परंतु त्यांचा उद्देश शिक्षणापेक्षा राजकीय स्वरूपाचा असलेला दिसतो. त्याचप्रमाणे ग्रामीण समाज राजकारणासंदर्भात जितका जागरूक असलेला दिसून येतो. त्याप्रमाणात शैक्षणिक वातावरणासंदर्भात जागरूक दिसत नाही. या गोष्टींचा लोकप्रतिनिधी फायदा घेतात. म्हणून याबाबतीत समाज जागृती होणे आजसुद्धा आवश्यक आहे.

खेड्यांतील विकासासाठी दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे रोजगाराची उपलब्धता, सुगीच्या काळात

सर्वांना रोजगार मिळतो; परंतु सुगी संपल्यानंतर हा प्रश्न निर्माण होतो. खेड्यात लघुउद्योग, व्यवसाय विकसित होणे गरजेचे आहे. त्यामुळे बारामाही लोकांना रोजगार मिळू शकतो. परिणामी ग्रामीण जनतेला इतरत्र जाण्याची गरज भासणार नाही.

उद्योगात शेतमाल प्रक्रिया उद्योगास मोठ्या प्रमाणात साहाय्य केल्यास शेतमालासही योग्य मोबदला मिळू शकतो. त्याकरिता अशा उद्योगास चालना देण्याकरिता अनुकूल वातावरण तयार करणे गरजेचे आहे. छोटे-मोठे उद्योग ग्रामीण भागात व्हावेत याकरिता शासनाकडून प्रयत्न केले जातात; परंतु काटेकोरपणे काही गोष्टींची अंमलबजावणी होत नाही. अशा उद्योगांना प्रेरणा देण्याकरिता शासनाकडून अनुदान दिले जाते. उद्योजक अनुदान मिळेपर्यंत मोठ्या प्रमाणात कार्यरत राहतो. एकदा का अनदान प्राप्त झाले की, अशा उद्योगाकडे दुर्लक्ष होते, परिणामी कालांतराने उद्योग बंद पडतात आणि शासनाचा उद्देश सफल होत नाही. अशी परिस्थिती निर्माण होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. त्यातील महत्त्वाची बाब प्रशासन होय.

प्रशासनाने आपली भूमिका चोख पार पाडली तर असे उद्योग सुरळीत चालू राहतील; परंतु चुकीच्या हव्यासासाठी या गोष्टी दुर्लक्षित केल्या जातात. ग्रामीण जनतेला याबाबतीत जागरूक करणे नितांत आवश्यक आहे. म्हणून या ठिकाणी असे म्हणावेसे वाटते की, जे श्रीसंत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून सांगितले आहे.

तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी ।।

तुमच्याजवळ सर्व काही आहे; परंतु त्याचा उपयोग कसा करावा, याची जाणीव आपल्यास होणे, या उक्तीचा मतितार्थ लाक्षणिक अर्थाने घेणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

**- डॉ. यशवंत भाऊराव दुबाले**
वाणिज्य विभाग

# बाबा

तुझ्या हाताला बसलेल्या चटक्याला
उपमा कसलीच मिळाली नाही,
तुझी पडद्यामागची भूमिका
आजपर्यंत मला कळाली नाही,
आज कळतंच तेव्हा
योगायोग कसा घडायचा
मी आजारी पडता
अश्रू लपवत तुमीच तर रडायचात...

हाताला पडलेल्या भेगा
आणि पायाला आलेले गोळे
मग कळलं मला माझेच
नशीब का एवढे चांगले
कळलंच नाही जिंदगी किती स्वस्त होती
डोळ्यात अश्रू लपवायची
तुमची कल्पना मात्र मस्त होती
परिवाराच्या समईत तेल कसं झिरपून गेलं आणि
माफ करा बाबा तुमच्यावर लिहायचं राहूनच गेलं...

मी कविता तर तुम्ही त्याचे कवी होता
मी मूर्ती तर तुम्ही त्याचे शिल्पकार होतात
अहो, आई तर खरंच काटकसर करत होती
खरे सांसारिक तर तुम्ही होतात
आणि आयुष्यभर माझ्यासाठी तोट्यात गेलात
इतके मोठे व्यापारी तुम्ही होतात
बाबा तुम्ही तुम्ही आहात
तुमची जागा कोणी नाही घेऊ शकत
माझं भविष्य तुमच्याशिवाय
दुसरं कोणी नाही लिहू शकत...

**- अमोल देविदास आकात**
बी.ए. तृतीय वर्ष

# गाव जगेल तरच देश जगेल...

आज देशात अनेक प्रकारे प्रगती होण्याऐवजी अनेक क्लिष्ट रुपांचे प्रश्न समाजाचा तोल ढासळवत असल्याचे दिसते. गाव विरुद्ध शहर असा असमतोलत्व, युध्दमय परिस्थितीचा प्रश्न अनेकांना अस्वस्थ करत आहे. हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. तरीपण त्याला साधे उत्तर सापडणारे नाही. संपूर्ण आर्थिक व्यवस्थेचाच नव्याने विचार करावा लागणार आहे. यासाठी आज राजकीय पक्ष व अनेक अर्थतज्ज्ञ तसेच समाजतज्ज्ञ, मनाने तयार नाहीत, हे सत्य आहे. यावरील उपाय लवकरात लवकर अंमलात न आणल्यास देशात बरीच गंभीर स्थिती निर्माण होऊ शकते. ज्येष्ठ नागरिक अशा स्थितीत नक्कीच भरीव व सकारात्मक काम करून नवीन क्रांती आणू शकतात.

इंग्रजांच्या काळात फारच थोडे अपवाद सोडता, आपल्या देशातील सामान्यांना जगातील घडामोडी तर सोडाच, आपल्या देशातील घडामोडींचीही विशेष माहिती नव्हती. ग्रामीण भागात तर या बाबतीत संपूर्ण अंधारच होता असे म्हणता येईल. दळणवळणाच्या व प्रसिध्दी माध्यमांच्या सोई त्या काळात उपलब्ध झाल्या नसल्याने बहुसंख्य लोकसंख्या संपूर्ण अज्ञानीच होती. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन दशकांत देशात ज्या प्रकारे औद्योगिकीकरण व इतर कार्यक्रम अंमलात येऊ लागले, ते अनेकांनी पहिल्यांदाच पाहिले होते. असे जरी असले तरी या नीवन प्रगतीची वाटचाल मुख्यत्वेकरुन प्रमुख शहरांभोवती सुरू झाली.

स्वातंत्र्योत्तर काळातील मोकळ्या वातावरणात देशात प्रथमच नव्या औद्योगिकीकरणाचे पर्व सुरू झाले होते. आपल्या देशाचे नेते त्यावेळी जे काही कार्यक्रम राबवित होते ते सर्व सामान्य नागरिकाच्या कल्याणासाठीच होते, अशी स्वतःची समजूत करून या प्रगतीचा प्रवाह आज ना उद्या आपल्यापर्यंत पोहोचेल या आशेवर सामान्य जनता, प्रामुख्याने ग्रामीण भागातील जनता जीवनाचा गाडा पुढे रेटत होती. या अपेक्षेत एक पिढी संपली. त्या पिढीच्या हातात काही लागले नाही.

मोठे कारखाने, मोठी धरणे, मोठी वीज निर्मिती केंद्र वगैरे उद्योग प्रथमच आपल्या देशात जनतेला बघायला मिळाले. त्यात काम करण्याची संधी मिळावी म्हणून अनेकांकडून सर्व प्रकारचे प्रयत्न होत असत. बहुतेक मोठे उद्योग सरकारी मालकीचे असल्याने लोकसंख्येच्या मानाने नोकऱ्यांची संख्या सिमित असल्याने त्या ठिकाणी अनेक राजकीय पुढाऱ्यांकडून आपल्या ओळखीच्या लोकांना रोजगार मिळण्यासाठी दडपण यायला लागले होते. पंडित नेहरू हे विचाराने



मार्क्सच्या समाजवादाकडे झुकले होते.

१) देशाची आर्थिक धोरणे प्रामुख्याने शहरात वसणाऱ्या औद्योगिकीकरणाला पूरक होती. त्यामुळे सर्व मोठ्या शहराभोवती पोटाची खळगी भरण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातून जनता गर्दी करु लागली.

२) आपला देश कृषिप्रधान देश आहे. हा मंत्र लहान मुलांपासून देशाचे कायदे तयार करणाऱ्या संसदेतल्या सदस्यांपर्यंत सर्वच मुक्तपणे आजही उच्चारून देशातील समृद्धीची स्वप्ने रंगवीत आहेत. परंतु त्याच वेळी देशाच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या एकूण रकमेपैकी फक्त १४.९ टक्केच ग्रामीण भागासाठी खर्च केली. ते प्रमाण दहाव्या योजनेत फक्त ५.२ टक्के झाले. यावरुन सरकार दरबारी शेतीप्रधान देश या मंत्राची कशी खिल्ली उडविली जाते याचा अंदाज सहज बांधता येईल.

३) मार्क्सचा शास्त्रोक्त समाजवाद फुसका निघाल्याने आता भांडवलशाही अर्थव्यवस्थेला जगात पर्यायच नाही, या भ्रमात भांडवलदार व त्यांच्या आशीर्वादाने सत्तास्थान काबीज करणारी राजकारणीत व्यक्ती आहेत.

४) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मानवनिर्मित मदारी असते. त्यातूनच सामान्यांचे शोषण चालू असते. पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क, बँड ट्रेड युनियन, सिमित दायित्वाच्या कंपन्या इ. मक्तेदारी कायद्यामुळे भांडवल विकेंद्रीकरण होत असते. दोन-तीन टक्के नागरिकांना अशा मक्तेदारी कायद्याच्या मदतीने अब्जाधीश बनण्याची स्वप्ने पडतात व त्यातून शेतकरी व असंघटीत क्षेत्रातील सामान्य व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीचे सतत शोषण चालू असते.

**- प्रियंका नंदकुमार आढे**
बी.एस्सी., द्वितीय

***

# आपली माणसं

कशी हरवत चालली आहेत
आज आपलीच माणसं
ज्यांच्यामुळे जगण्याची दोर सावरली
त्यांच्यासाठी कडूपणा,
ज्यांच्यामुळे स्वप्नांची मेढ ढासळली
त्यांच्यात का रे रस तुला?

त्यांच्याशिवाय तुझी सकाळ होत नव्हती
त्यांच्याकडे कशी पाठ फिरवलीस रे तू
त्यांच्या प्रेमाचा नाही कळला अर्थ तुला
आज तुझी वेगळी वाट धरलीस रे तू

का प्रेम नको सवई वाईट हव्या तुला?
का साथ नको घात वाईट हवाय तुला?
का रंग नको बेरंगी जीवन हवंय तुला?
का आपली नको परकी माणसं टवी तुला?

कधी वळून बघ मागे
आपली माणसं वाट बघताहेत
येशील परत आमचा म्हणून
ते या आशेवरच जगताहेत

तेव्हा समजेल तुला
आपली माणसं आपलीच असतात
सोडून देशील परक्यांना
तेव्हा कळेल तुला
प्रेमाचा अर्थ आणि
तेव्हा मिठीत घेशील तू
आपल्या माणसांना...

**- कु. वैष्णवी अशोक भूंबर**
११ वी विज्ञान



# हिंदी विभाग

✻ मार्गदर्शक ✻

**प्रा. डॉ. विजयानंद गंगावणे**

**प्रा. डॉ. विठ्ठल वजीर**

**प्रा. डॉ. नितीन माने**

✻ संपादक ✻

अजय बिडवे (बी.एस्सी. द्वितीय)

कु. सुचित्रा साळवे (बी.ए. तृतीय)

परमेश्वर शिंदे (बी. ए. तृतीय)

# हिंदुस्तान



प्यारा है हमारा हिंदुस्तान
इसमें ही बसती है हमारी जान
है ऐसा ये हिंदुस्तान
जिस पर है हमे गुमान

एक दिन कुछ ऐसा करके दिखाना
के हिंदुस्तान को सोने की चिडियाँ बनाना
कम नही हम किसीसे
ऐसा बहोत कुछ करके है बताना

हिंदुस्तान अलग अलग मजहब का है घर
यहाँ हर मजहब का है दर
और यहाँ सब
रहते है मिलजुल कर

हिंदुस्तान को बुरी नजर से है बचाना
क्यूंकी ये है हमारा किमती खजाना
लोग भूल गये इस बात को
इस बात का अहसास है दिलाना...

**- दीपक वसंत बरकुले**
बी. एस्सी., एस. वाय.

# मोहब्बत ऐसी है होती



मोहब्बत सबकी होती है खास
दूर जाने पर होता है इस बात का एहेसास
कदर करलो मोहब्बत की
जब तक हो वो आपके पास

मोहब्बत दिल की है शान
मोहब्बत से दिल होता है बागबान
अगर ना होती मोहब्बत
तो दिल में नही रहती जान

मोहब्बत हसाती भी है रूलाती भी है
मोहब्बत सताती भी है तडपाती भी है
इतना सब कुछ होने के बावजूद
मोहब्बत बीना जिंदगी नही जिए जाती है

मोहब्बत को पाना होता अगर आसान तो
सब को मिल जाती
मोहब्बत नही आसान इसलिए
मुशकिल आ जाती
लेकीन जो करे सच्ची मोहब्बत
तो उसे वो मोहब्बत है हासील हो जाती

**- सानिया सय्यद वजीर**
१२ वी कला

# बातचीत (लडका-लडकी)

लडका : बना कर रखूँगा तुझे मेरी जान
बस तू एक बार तो जा मान
समझ ले बस तू...
के तुझ में ही हे मेरा जहान

लडकी : दिल को मैंने इसलिए है रोका
के कही तू दे ना दे धोका
तू आकर चला जाएगा ऐसे मेरे जिंदगी से
जैसे आता है हवा का झोंका

लडका : ऐसा नही करूँगा यार
करले तू मुझ पर ऐतेबार
दिल से करता हूँ मैं
आज अपनी मोहब्बत का ईजहार

लडकी : तेरी मोहब्बत का दालू क्या आचार
भले ही तू करले दिल से इजहार
एक ना एक दिन तू भी
हो जाएगा तू भी बेजार

लडका : हो जा तू थोडासा बेफिकीर
इतना ना मोहब्बत से डर
मोहब्बत मिलती है नसीबो से
इस बात पर मान खुदा का शुकर

लडकी : मोहब्बत से नाही हूँ मैं डरती
बस थोडीसी फिकर हूँ में करती
एक और बात बतादू तुझे
के हर बात में खुदा का शुकर आदा हूँ करती



लडका : एक बात मैं तुझे साफ बतादूँ
मोहब्बत में सिरफ तुझेही करता हूँ


लडकी : अच्छी बात है तू मोहब्बत मुझसे है करता
मग मेरा दिल मोहब्बत ही से है डरता
तू छोड  देगा एकेला मुझे एक दिन
इस बात से दिल है समभलता

लडका : ईशक दिल से करते है
हम सिर्फ तुम पे मरते है

लडकी : मरने की ना करो तुम बात
दिन और रात
हम भी करते है वादा
देंगे जिंदगी भर तेरा साथ
मेरी और तेरी
कहानी ना हो अदहुरी
दुआ है मेरी रब से
ना आए कोई मजबुरी

**- दिपाली सुभाष इंगळे**
१२ वी कला

# धोका



मोसम है ये सुहाना
याद आ रहा है मोहब्बत का जमाना
जिस से दिन लगाया था हमने
याद आ रहा है आज वो दिवाना

मोहब्बत मेरी कमाल थी
सब के लिए एक मिसाल थी
ऐसा कुछ भी नही था
ये सिर्फ मेरी बेखयाली थी

सच्ची थी मेरी मोहब्बत ऐसा था मेरा भरम
पर नही निकला मेरी मोहब्बत में दम
सोचा था मोहब्बत पा ली तो सब कुछ पा लिया
मगर उसकी मोहब्बत ने दिया मुझे सिर्फ गम

जिसकी मोहब्बत को करते है याद
उसने मुझे किया है बरबाद
अब ना हो मोहब्बत किसीसे
दिल करता है यही फरयाद

**- साना शेख सरताज**
१२ वी कला

# दुख और सुख

कब से हुआ सवेरा, कब सूर्य जगमगा
कब रात ऐसे गुजरी कब दिन मुस्कुराया ।।धृ।।
हर दुख के बाद सुख है,
हर सुख के बाद दुख है,
दुख के बाद फिर से,
सुख ही तो चला आया ।

कब से हुआ सवेरा
दुख को देख तुने, कैसा रुंधन मचाया,
सुख की भावना में,
तू तो, कैसा खिलखिलाया ।
कब से हुआ सबेरा...

जब जनम तेरा हुआ, तो सबने मंगल गाया,
जब तू मर गया तो, परिवार किलबिलाया।
कब से हुआ सबेरा...

जब घर में कोई खुशी है
और लोगों में बटी हो,
इन्सान ने यूँ मिलकर,
खुब मजा उड़ाया ।
कब से हुआ सबेरा...

दुख है तो कैसा, सबको इसने सताया,
दुख को मिटाने, सुख दोस्त बनके आया।

कब से हुआ सवेरा, कब सूर्य जगमगा
कब रात ऐसे गुजरी कब दिन मुस्कुराया

**- दिपाली आबा गोरे**
बी.एस्सी प्रथम वर्ष

# मेरी जरूरत !

ख्वॉब हो या कोई पहेली
या कोई हकिकत हो ।
हो जो भी तुम
पर मेरी जरूरत हो।

आँखो से दिल तक
अब उतरने लगे हो।
साँसो से रुँह में।
अब बसने लगे हो।
क्या तुम कोई ख़ुदा की मेहनत हो
हो जो भी तुम
पर मेरी जरूरत हो।

बिना तुम्हारे अब
ये जीना मोहाल हैं।
कैसे बताए के ये क्या हाल हैं।
क्या तुम कोई ख़ुदा की नजाकत हो ।
हो जो भी तुम
पर मेरी जरूरत हो।

खयालो में तुम
इरादों में तुम
अब समाने लगे हो।
आ के जिंदगी मे तुम
गुनगुनाने लगे हो ।
क्या तुम कोई ख़ुदा की रेहमत हो ।
हो जो भी तुम
पर मेरी जरूरत हो ।
हाँ तुम मेरी जरूरत हो ।


# माँ



घर में भगवान होती है माँ,
बाहर से दयावान होती है माँ ।
अपनी औलाद की हर गलतियों
की सजा माफ करती है माँ ।
किसी के लिए भार होती है माँ।
माँ की बात क्या करें हम दुखों को सहके,
बच्चे को सुख देती है माँ ।
सरगम की एक स्वर है माँ,
किसी की नजर में ईश्वर है माँ ।
जरा जाकर उनसे पूछो जिनकी नही है माँ,
जरा पूछो उनसे कि वे किसे कहते है माँ ।
दिन के उजाले में भी रात दिखाई देती है,
माँ तो भगवान से भी बड़ी है, यह बात सही है।
कवि लिख नहीं पाये कि
माँ की क्या परिभाषा होती है,
मरके के बाद भी सपनों में
बच्चों के लिए भाषा होती है माँ
किसी की माँ तो माँ होती है,
हर एक नारी का रूप एक दिन माँ होता है।
नारी के चारों रूपों मे माँ रूप महान है,
जो माँ को कोई कष्ट न दे वही बेटा महान है
मुझे यही कहना है, माँ को कभी नहीं भुलाना है,
हर जन के अंदर माँ के प्रीत-प्यार को फैलाना है।

**- निकीता महादेव लाटे**
बी. ए. द्वितीय वर्ष

# समय और प्रदुषण



समय और प्रदुषण का है खेल सारा
बदल गया है हर वो नजारा
फैला है प्रदुषण चारों और
निगला है जिसने चैन अमन सारा
समय और प्रदुषण का है खेल सारा

जिधर भी देखो उधर गरमी,
खिरती है, जिसके कारण,
पहाडो पर भी आग लगती है,
जो ढुँढते है बारिश का सहारा,
समय और प्रदुषण का है खेल सारा

पानी के बिना कही मछली तड़पती
ये असंतुलन का ही तो है खेल सारा
समय और प्रदुषण का है खेल सारा

इतनी शि से पृथ्वी ने,
जिसे अपने में संभाला,
अपने ऐशो आराम के लिए,
इन्सानों ने पेड़ो को ही काट डाला,
समय और प्रदुषण का है खेल सारा

**- दिपाली आबा गोरे**
बी.एस्सी प्रथम वर्ष

# हद पार कर...

समंदर कितना गहरा है ये मत सोच
समंदर को नापने की तू हद पार कर...
दुनिया मैं कितनी नफरत हैं लोंगो मैं
तू उसे प्यार से मिटाने की हद पार कर...
हो कितनी भी मुश्किल तेरे जीवन मैं
तू उसे डटकर लढणे की हद पार कर...
हो जाये तेरे जीवन मैं अंधेरा जैसा अविश्वास
तू उसे ज्योती जैसा प्रकाशमय
करने की हद्द पार कर...
तू ऐ देख की दुनिया कितनी खूबसुरत हैं
बस तू इसे हमेशा खूबसुरत रखने की हद पार कर...

**- प्रा. अमोल काळे**
रसायनशास्त्र विभाग

***

- नाकामयाब लोग दुनिया के डर से अपने फैसले बदल देते हैं ।
  और कामयाब लोग अपने फैसले से पूरी दुनिया बदल देते हैं
- अपने हौसलों को ये मत बताओ कि तुम्हारी परेशानी कितनी बड़ी है, बल्कि अपनी परेशानी को ये बताओ कि तुम्हारा हौसला कितना बड़ा है।
- सफलता हमारा परिचय दुनिया को करवाती है और असफलता हमें दुनिया का परिचय करवाती है ।

## कुछ पाने के लिए



कहते है, कुछ पाने के लिए
कुछ खोना पड़ता है।

तो में तयार हूँ खोने के लिए
कल की सुकून भरी जिंदगी के लिए
आज की आराम की निंद

कल का विद्वान कहलवाने के लिए
मैं आज का वक्त खोने को तैयार हूँ ।


मैं तैयार हूँ खोने के लिए
माँ-बाप के सेवा के लिए
आज का माया भरा प्यार ।

कल के हर दिल में बसने के लिए
मैं आज मेरे दिल को खोने को तैयार हूँ।

मैं तैयार हूँ खोने के लिए
कल का विजेता होने के लिए
आज की हर जीत ।
हाँ, मै तैयार हूँ खोने के लिए
कल के बोझ विरहीत मौत के लिए
आज की यह जिंदगी ।

***

## आज ही कुछ



बातों ही बातों में
वक्त गुजर जाता है,
नजर नहीं आता कुछ काम

जीव हूँ इसलिए जिता हूँ
कर नही पाता कुछ विशेष रूप से

खयाल बडे-बडे नजर में हैं
वह खयाल भी चाँद बन जाते हैं
बस रुँह को मिलता है आराम ।


रोजाना भाग दौड़ इसलिए दौडता हूँ
पर रहता हूँ वही के वही भूमंडल पर

सोचता हूँ आजही कुछ कर लूं
कल की भी यही बात है
नही तो है फिर दिनभर पसीना
और कष्ट भरी हर रात हैं।

***

**गोरख विश्वनाथ बिडवे**
बी.ए. प्रथम वर्ष

## हमारे अध्यापक



आपने हमको पढाया,
जिंदगी का मायना हमको सिखाया ।।

ये दुनिया जो बढ रही है आगे,
इसको बढ़ना आपने सिखाया ।।

मुश्कील हो या आसान,
हमको पढना आपने सिखाया ।।


अंग्रेजी हो या हिंदी,
इनको समझाकर आपने सिखाया

जिंदगी होती ज्ञान के बिना,
तो मुश्कील होता इस दुनिया में जीना ।।

भगवान ने जनम तो दिया मगर...
इस दुनिया में इज्जत से जीना आपने सिखाया

**- ऋषी गणेश बिडवे**
बी. ए. प्रथम वर्ष

## हमें प्यार है



ताजुब की बात नहीं
हमे प्यार है।

हमारा प्यार जान हमारी और ईमान है।
ये जिंदगी मोहताज हैं उसकी
उससे ही हम आज हैं।

ये जिंदगी मानू गुलशन तो
यह हर जिंदगी का ताज हैं।

शायद आप भी कहोगे...
आप उससे प्यार करते हैं।

हम यह मान लेंगे क्यों की
आपके रगो में उसका ही खून हैं।

वह कोई गैर, कोई और नहीं,
हम जिस देश के वासी,
वह सबका प्यारा
भारत हमारा हैं।

**- अजय बद्रीनारायण बिडवे**
बी.एस्सी. प्रथम वर्ष

# वक्त नहीं...



हर खुशी है लोगों के दामन में
पर एक हसी के लिए वक्त नही ।
दिन रात चलती दुनिया में,
जिन्दगी के लिए ही वक्त नहीं ।

मां की लोरी का एहसास तो है,
पर मां को मां कहने का वक्त नहीं ।
सारे रिश्तो को तो हम मार चुके,
अब उन्हे दफनाने का वक्त नहीं ।

सारे नाम मोबाईल में है,
पर दोस्ती के लिए वक्त नहीं ।
आँखो में है निंद बडी
पर सोने का भी वक्त नहीं ।
पैसों की दौड़ में ऐसे दौडे की,
थकने का भी वक्त नहीं ।

पराए एहसान की क्या कद्र करें
जब अपने सपनों के लिए ही वक्त नहीं ।
तू ही बता ए जिन्दगी ऐसी जिन्दगी का क्या करे
की हर पल मरने वालों को
जीने के लिए भी वक्त नही!

***

# आशा ही जीवन है



आशा मानव हृदय की एक सुंदर भावना है
जिसके टुट जाने पर जीवन व्यर्थ लगने लगता है।

जीवन में दुखों का कोई पार नहीं है
आशा रखने वालो की कभी हार नही है ।

विद्यार्थी सफल होने की आशा से ही पढाई करता है
सैनिक विजय की आशा से ही युद्ध करते है

व्यापारी लाभ पाने की आशा से ही व्यापार करता है
धनी व्यक्ती कीर्ति पाने की आशा से दान करता है

आशा जीने का हौसला महत्त्वाकांक्षा होती है
सचमुच, आशा जीवन की शक्ति होती है ।

**अजय बद्रीनारायण बिडवे**
बी.एस्सी. प्रथम वर्ष

# भ्रष्टाचार

आज कोई भी वर्तमानपत्र खोलकर देखते हैं, तो भ्रष्टाचार की खबर नहीं, ऐसा कोई दिन नही जाता है। इसी कारण देश में सब जगाहों पर असत्य, अनाचार, कालाबाजारी, सिफारिश, रिश्वतखोरी, जमाखोरी, घूसखोरी इस प्रकार के भ्रष्टाचार ज्यादा देखने को मिलते है। फिर भला इस स्थिती में कोई देश कैसे तरक्की कर सकता है? भारत जैसे स्वतंत्र देश में हर जगह भ्रष्टाचार की बुरी बिमारी फैली हुई है। कही भी देखिए भ्रष्टाचार ही भ्रष्टाचार है। भ्रष्टाचार सभी को नजर आ रहा है; परंतु कोई भी कुछ नहीं कर पा रहा है। भ्रष्टाचार सिर से लेकर पाओं तक फैला हुआ है। उसके छूने से सारा वातावरण दुषित हो रहा है। भ्रष्टाचार लोगों के आदर्शों और उत्तम विचारों को नष्ट कर रहा है। आज शिक्षा के क्षेत्र में भ्रष्टाचार का बोलबाला है। इस भ्रष्टाचार के कारण गरीब लोग अपने बच्चों को अच्छे स्कूल में पढ़ा नही सकते और भ्रष्टाचार के होते वह अच्छी शिक्षा नही ले सकते। जिस के कारण उनका भविष्य संकट में आ चुका है। सभी देशो में शिक्षा संस्था एक दुकान बन गई है। बिना डोनेशन के स्कूलों में बच्चों को भर्ती नही किया जाता। पैसों के लिए प्रश्नपत्र बेचे जाते है। इतनाही नहीं पैसे लेकर बिना पढे या बिना परीक्षा दिए भी प्रमाणपत्र मिल जाता है। भ्रष्टाचार हमारे देश पर एक कलंक है। जो मिटने का नाम नहीं ले रहा है।

बाजारों में तो बहुत ज्यादा भ्रष्टाचार होता हैं । सभी जगहों पर नकली चीजों की मिलावट होती है । दुध में पानी है या पानी में दुध पता लगाना मुश्कील है । सरकारी दफ्तरों में हर स्तर पर रिश्वत ली जाती है। अगर किसी मजबुरी में रेल्वे का टिकट लिया जाए तो उसमें भी रिश्वत ली जाती है। कोई भी उस व्यक्ती की मजबुरी को नही समझता उन्हें तो सिर्फ पैसों से मतलब है। चुनाव आए नही के एक दुसरे को रिश्वत देना चालू हो जाता है। चुनाओं में फर्जीदान आम बात हो गयी है।

*''गरीबों की उम्मीद से बनी सरकार डुबा रहा है,*
*देश को नेताओं का भ्रष्टाचार''*

भ्रष्टाचार के कारण हमारे समाज का विकास नही हो पा रहा है। देश की विकास में बाधा पहुँच रहीं है सभ जगह पर भ्रष्टाचार के होते देश बिलकूल उन्नती नही कर पा रहा है। सामाजिक न्याय भी नही हो रहा है। गरीब एवं सच्चे व्यक्ती से भी रिश्वत लेकर न्याय देने बात की जाती है। समाज में कपट - झूठ - बेईमानी- धोकेबाजी का बोलबाला बहुत ज्यादा है। और गैरकानुनी प्रवृत्तीयों को जन्म दे रही है। नई वस्तु को पाने का आनंद बढ़ता जा रहा है। लेकीन ये नही दिखाई दे रहा है, कि भ्रष्टाचार हमारे लिए बडी समस्या है। वह हमारी जिंदगी को बरबाद कर रहा है। और हमारा देश भी उन्नती नहीं कर पा रहा है।

*ऐसी सरकार के होते देश उन्नती कैसे करे*
*सभी जबाबदार पदों की आड में भ्रष्टाचार बढ़े*

इस भ्रष्टाचार को रोकने के लिए क्रांतिकारी कदम उठाने की आवश्यकता है। परंतु यह सभी तभी हो सकता है, जब देशवासी सच्चाई का साथ दें, भ्रष्टाचार के खिलाफ एक साथ अपनी आवाज उठाकर नेताओं को अपनी कुर्सी का मोह, अपने पराए की भावना, जातीवाद आदी की भावना को त्यागना होगा। नेताओके भ्रष्टाचार के सामने हमारी योजना कम पड जाय; परंतु हमे हार नाही माननी चाहिए ।

*''देश में बढा भ्रष्टाचार*
*जिस को चला रही है हमारी खिचडी सरकार''*

**- ज्ञानेश्वर भगवान बिडवे**
बी. ए. प्रथम वर्ष

# लाइफ बनानी हो तो कॉलेज में आइए...



कैसे पहचाने कॉलेज की दुनिया? इस सवाल का जवाब देते समय मै तो कहूँगी दिल में हो बहुता जोश साँसों में हो तुफान, ऐसी होती है यह कॉलेज कि दुनिया पढ़ना लिखना तो यहाँ ही सिखाया जाता है । अपने मर्जी से जीना है तो कॉलेज में आइए। क्योंकि वह एक खुला आसमान हैं हमारे लिए। यही वह जगह हैं। सड़क अच्छी न होने के कारण हमें बहुत कष्ट सहना पड़ता है। फिर भी बस में कोई किसी पर धड़के तो उसके उपर कमेन्ट करना उसकी हँसी मजाक उड़ाना, यह तो हमारे लिए कॉलेज आने तक हररोज की बात बन गई है।

कॉलेज के बारे में लड़कों की अलग ही होती है सोच। उनका एक की होता है ध्यान। सीर्फ लड़कियाँ पटाना यही है उनका काम। इतना ही नही, तो अपने यारों से गर्व से कहते है कि, यही है मेरी जान। लड़कियों को अपने जाल में फँसाना यहीं तो होता है इनका प्लॅन।

कुछ तो दादागिरी करनेवाले लडके कहते है अपने आप को डॉन, लेकिन कॉलेज में फेल होने के बाद इन्हे पुछेगा कौन?

कॉलेज छोड़कर जब तू चला जाएगा। तब तेरा ये दोस्त जरुर रोएगा। क्योंकी, दोस्ती निभाने का वादा जो तुने किया था। जब मेरा कॉल तुझे आएगा। तब बिझी तू रहेगा। अच्छी नौकरी मिलने के कारण ऐश तू करेगा। नए दोस्तों के साथ रहने के कारण और इतना ही नही बड़े-बड़े पार्टियों में जाने से कंगाल तू होगा । तब ये दोस्त बुरे वक्त में याद आएगा। इतना ही नही दोस्त बीते हुए लम्हों को बार-बार याद करेगा ।


इसलिए आखरी पंक्ति में कहती हूँ, दोस्त...

**ऐश के साथ यही पढना भी चाहिए ।**

**लाईफ बनानी हो तो कॉलेज में आइए ।**

**- अंजली लाटे**
बी.ए. द्वितीय वर्ष

अवसरों की राह देखनेवाले व्यक्ती साधारण होते है ।
जब की असाधारण व्यक्ती अवसरो के जन्मदाता होते है ।



# ENGLISH SECTION

## Guide

**Prof. Dilip Manvar**

**Prof. Dr. Abhishek Fund**

## Editor

**Krushna Patil** (B.Com. S.Y.)

**Shankar Shinde** (B.A. S.Y.)

# Extreme Weather : Impacts of Climate Change

When it comes to connecting the dots between climate change, extreme weather and weather and health, the lines are clear.

The earth is saying something with record heat, drought, storms and fire. Scientists are telling us this is what global warming looks like.

**It's time to listen - and take action there's plenty we can do.**

Carbon pollution is the main reason our planet is getting hotter, increasing the chances of weather disasters, drought and flood and hurting our healt.

There are solutions. For starters, we can cut carbon pollution by reducting our dependence on fossil fuels and increasing our use of clean renewable energy. And we can implement policies that help us prepare for fooding, drought stroms and other conseqences of climate change.

But First, we need national leadership that will stop ignoring what the earth and scientists are telling us about climate change and instead start ignoring hose who continue to deny it is happeing.

Here's what the first six months of 2012 brought :

- The hottest January to June ever recorded in the continental United Stated.
- More than 22,000 daily high temperature records tied or broken.
- The largest drought declaration in over 50 years, with more than two-thrids of the continental United States in drought at the end of July.
- One of the most destructive freak derecho stormsin history.
- Fires in Colorado that have destroyed more thatn 700 homes.

Unfortunately, the first half of 2012 is not the excerption. It's becoming the new normal. In 2011 for instance, and unprecedented 14 disastrous weather events resulted in an estimated $53 billion in damage-not including health costs. But the trend gmes back much further. In fact, the 13 warmest years ever recorded have occurred since 1997, according to the United Nations World Meteorological Organization. June 2012 also marks the 328th consecuting month with a global temperature above the 20th century average.

The extreme weather of 2012 has already caused billions of dollars worth of damage, but again, that's just part of the trend. Learn more from the National Oceanic and Atmospheric Administration's (NOAA's) billion-dollar weather/climate disaster page.

There's little doubt that climate change is contributing to the etreme weather disasters we've been experencing. Numerous studies, such as this one conducted in connection with NOAA's 2011 State of the Climate report, shows the clear links between extree weather and human-induced climate change.

There are solutions to address

extreme weather tied to climate change. For starters, We need our lawmakers to quit ignoring climate change and start limiting carbon pollution that is heating our planet and increasing the intensity of extreme weather.

Extreme heat in the first half of 2012 killed at least 74 Americans.

But the climate change-related heat mortality in the first half of 2012 is just part of a deadly trend. In 2011, at least 206 people died from extreme heat, up from 138 fatalities in 2010 and nearly double the 10-year average, according to the National Oceanic and Atmospheric Administration.

If we don't do more to reduce fossil fuel emissions and other heat-trapping greenhouse gases that are making heat weaves more intense, more thatn 1,50,000 additional Americations could die by the end of this centuary due to excessive heat.

Heat-related death is just one deadly side effiect of extreme weather tied to climate change. Extreme stroms can cause drowning, contaminate drinking water and result in outbreaks of infections dseases. Heat and ozone smog increase respiratory diseases such as asthma and worsens the health of people suffering from cardiac or pulmonary disease.

There are solutions to address the health effects of climate change. For starters, we need our lawmakers to quit ignoring climate change and start limiting carbon pollution that is heating our planet and increasing the intensity of extreme weather.

**- Tejas Laxman Borkar**

# Messaging Asset



❖ Relationship is like 'Honey'
But don't compare it with 'Money'
It is not a 'Collection of Art'
But it is a 'Selection of Heart'

❖ A smile is a curve that makes
everything straight.

❖ Money is a small coin,
Health is a gib coin,
Love is a luckey coin,
Friendship is a sweet coin
&
Relationship is a gold coin
keep it safe.

❖ Arguement is bad but discussion is good because, arguement is to find 'Who is right?'
&
Discussion is to find out
'What is right?'

❖ Always the happy
Always wear a smile
Not because life is full of reasons to smile.
But because your smile itself is a reasons for many to smile.

**- Rushikesh Janardhan Bidve**
B.Sc. S.Y.

# Technological Globalization

Technological globalization is accelerated in large part by technological diffusion, or the spread of technology across borders. In the last two decades, there has been rapid improvement in the spread of technology to peripheral and semi-peripheral nations, and a 2008 World Bank report discussed both the benefits and ongoing challenges of this diffusion. In general, the report found that technological progress and economic growth rates were linked, and that the rise in technological progress helped improve the situations of many living in extreme poverty (World Bank 2008). The report recognized that rural and low-tech products such as corn can benefit from new technological innovations, and that, conversely, technologies like mobile banking can aid those whose rural existence consists of low-tech market vending. In addition, technological advances in areas like mobile phones can lead to competition, lowered prices, and concurrent improvements in related areas such as mobile banking and information sharing.

However, the same patterns of social inequality that create a digital divide, or the uneven access to technology among different races, classes, and geographic areas, in the United States also create digital divides within other nations. While the growth of technology use among countries has increased dramatically over the past several decades, the spread of technology within countries is significantly slower for certain nations. In these countries, far fewer people have the training and skills to take advantage of new technology, let alone access it. Technological access tends to be clustered around urban areas and leaves out vast swaths of citizens. While the diffusion of information technologies has the potential to resolve many global social problems, it is often the population most in need that is most affected by the digital divide. For example, technology to purify water could save many lives, but the villages most in need of water purification don't have access to the technology, the funds to purchase it, or the technological comfort level to introduce it as a solution.

**Technological Inequality**

As with any improvement to human society, not everyone has equal access. Technology, in particular, often creates changes that lead to ever greater inequalities. In short, the gap gets wider faster. This technological stratification has led to a new focus on ensuring better access for all.

There are two forms of technological stratification. The first is differential class-based access to technology in the form of the digital divide. This digital divide has led to the second form, a knowledge gap, which is, as it sounds, an ongoing and increasing gap in information for those who have less access to technology.

Simply put, students in well-funded schools receive more exposure to technology than students in poorly funded schools. Those students with more exposure gain more proficiency, which makes them far more marketable in an increasingly technology-based job market and leaves our society divided into those with technological knowledge and those without.

Since the beginning of the millennium, social science researchers have tried to bring attention to the digital divide, the uneven access to technology among different races, classes, and geographic areas. The term became part of the common lexicon in 1996, when then Vice President Al Gore used it in a speech. This was the point when personal computer use shifted dramatically, from 300,000 users in 1991 to more than 10 million users by 1996 (Rappaport 2009). In part, the issue of the digital divide had to do with communities that received infrastructure upgrades that enabled high-speed Internet access, upgrades that largely went to affluent urban and suburban areas, leaving out large swaths of the country.

At the end of the twentieth century, technology access was also a big part of the school experience for those whose communities could afford it. Early in the millennium, poorer communities had little or no technology access, while well-off families had personal computers at home and wired classrooms in their schools. In the 2000s, however, the prices for low-end computers dropped considerably, and it appeared the digital divide was naturally ending. Research demonstrates that technology use and Internet access still vary a great deal by race, class, and age in the United States, though most studies agree that there is minimal difference in Internet use by adult men and adult women.

Data from the Pew Research Center suggests the emergence of yet another divide. Larger percentages of groups such as Latinos and African Americans use their phones rather than traditional computers to connect to the Internet and undertake related activities. Roughly eight in ten White people reported owning computers, in contrast to roughly six in ten Black and Hispanic people owning them. White people were also more likely to have broadband (high-speed Internet) in their homes. But approximately one in four Black and Hispanic people reported being smartphone-only Internet users, a number that far outpaces White people's reliance on the devices. While it might seem that the Internet is the Internet, regardless of how you get there, there's a notable difference. Tasks like updating a résumé or filling out a job application are much harder on a cell phone than on a large-screen computer in the home. As a result, the digital divide might mean no access to computers or the Internet, but could mean access to the kind of online technology that allows for empowerment, not just entertainment.

Another aspect of the digital divide is present in the type of community one lives in. Census data released in 2018 showed that in the study period of 2013 to 2017, 78 percent of U.S. households had Internet access, but that homes in rural and low-income areas were below that national average by 13 percent. The data was collected by county, and showed that "mostly urban" counties significantly outpaced "mostly rural" counties. "Completely rural," lower-income counties had the lowest rates of home Internet adoption, at about 60 percent.

One potential outcome of reduced home Internet and computer access can be the relatively low representation of certain populations in computing courses, computing majors, and computing careers. Some school districts, often with the help of government grants or corporate sponsorships, aim to address this aspect of the digital divide by providing computers to those who need them, either at a low cost or at no charge. A number of organizations, such as Code.org, Black Girls Code, and Black Boys Code, work to overcome the disparity by offering computer science education programs and camps, collaborative instruction programs with local school districts, and (perhaps most impactful in the long term) teacher training programs. As a result, the number of Black and Hispanic students in courses like Advanced Placement Computer Science has increased dramatically in recent years, as has the number of college majors from the same populations.

As a whole, the digital divide brings some level of controversy. Some question why it still exists after having been identified more than twenty years ago. Others question whether or not it exists at all, and offer data to support the claim that it does not exist (American Press Institute 2015). However, most experts agree that the COVID-19 pandemic revealed that the digital divide has persisted, particularly in education. While millions of students were confined to home and remote instruction, they were divided by their Internet access, their familiarity with computer hardware and software, and their ability to solve their own technology issues. Even when governments and educational institutions implemented improvements to the access and technology situation, there remained the qualitative aspect of unplanned remote education: Many instructors and students are not as effective while communicating only through computer screens. When considering education, policymakers faced arduous decision-making processes and contentious debates as they tried the balance the issues of safety, educational quality, teacher safety, student mental health, and the overall changing landscape of the pandemic.

**- Puja Ganesh Devkar**
B.A. F.Y.

## Always use branded

| | | |
|---|---|---|
| For Lips | - | Truth |
| For Voice | - | Prayer |
| For Eyes | - | Sympathy |
| For Hands | - | Charity |
| For Heart | - | Love |
| For Face | - | Smile |

----------

## MUSIC




Music is a part of my
everyday life,
it's the one thing
that makes me feel alive,
no matter what it
could be,
all music influences me
music teaches me
everything the words you
know it suits you, without music I do
know what I would do,
when I feeling bad it's the only palce,
I can go to,
Whatever your feeling whether
it's happy, sad of fear,
just turn it up and listen to
what you hear, to me music could
never go wrong, i could listen to
it all day long

**- Rushikesh Janardhan Bidve**
B.Sc. S.Y.

## Good Thoughts

1) I cried when I had no shoes but stopped crying when saw a man without legs.
2) As heat conserved is transmuted into energy, so anger controlled can be transmuted into a power which can move the world.
3) Attitude defined in the best way - I just love it when someone hates me for no reason, and I just have it when someone loves me for a reason.
4) Life is a continuous challenge and an unending struggle. We are not made rich by 'What is in our pocket?' But we are rich by 'what is in our Heart?'
5) It is not important to go to Heaven after we leave, but it is important to create heaven in someone's heart before we leave.
6) Success comes when preparation meets opportunity.
7) Every little smile can touch somebody's heart, no one is born happy but all of us are born with the ability to create happiness.
8) Don't offer advice unless you have gained it through experience.
9) Drop of water in lake, has no identity but it falls on Lotus it shines like pearl, Choose best place where you can shine.
10) Thoughts can make you more ill than any virus.

**- Alka Bapurao Borkar**
B.A. F.Y.



# सांस्कृतिक विभाग

*** राजर्षी शाहू महाराज जयंती**

दि. ६ जुलै २०२१ रोजी राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त इंग्रजी विभागप्रमुख प्रा. दिलीप मनवर यांचे 'शाहू महाराज आणि आजचा समाज' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांची उपस्थिती होती.

*** साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी**

दि. १ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयात अण्णा भाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यानिमित्त मराठी विभागप्रमुख डॉ. अशोक पाठक आणि इतिहास विभागप्रमुख डॉ. सखाराम टकले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. अशोक पाठक यांनी 'मराठी साहित्यात अण्णा भाऊंचे वेगळेपण' या विषयावर आपले विचार व्यक्त केले तर प्रा. डॉ. सखाराम टकले यांनी 'लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय चळवळीतील योगदान' या विषयावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा. डॉ. रवी प्रधान यांची उपस्थिती होती.

*** १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन**

दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे सचिव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तद्नंतर स्वातंत्र्यदिनानिमित्त सांस्कृतिक विभागातर्फे राष्ट्रभक्तीपर गीत गायनाचा कार्यक्रम पार पडला. यात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

*** विद्यापीठ वर्धापन दिन**

दि. २३ ऑगस्ट २०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण झाले. 'आपले विद्यापीठ' या विषयावर प्रा. डॉ. दिनकरराव टकले यांचे व्याख्यान यावेळी संपन्न झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांची उपस्थिती होती.

*** ५ सप्टेंबर शिक्षक दिन**

दि. ५ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वतीने 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. शंकरराव तळेकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. रवी प्रधान हे होते. उपप्राचार्य प्रा. अशोक खरात यांचीही याप्रसंगी उपस्थिती होती.

*** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन**

दि. १७ सप्टेंबर २०२१ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा करण्यात आला. इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. सखाराम टकले यांनी 'मुक्तिसंग्रामात परतूर तालुक्याचे योगदान' या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांची उपस्थिती होती.

*** म. गांधी व लाल बहादूर शास्त्र जयंती**

दि. २ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयात म. गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. पुरुषोत्तम वायाळ व उपप्राचार्य डॉ. रवी प्रधान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रा. बद्रिनारायण बिडवे हे होते.

*** सावित्रीबाई फुले यांची जयंती**

दि. ३ जानेवारी २०२२ रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. डॉ. वैशाली चौधरी यांचे व्याख्यान पार पडले. यावेळी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपली मनोगत मांडली.

# महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा

दि. ६ डिसेंबर २०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात ६५ वा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे हे होते. तर प्रमुख व्याख्याते म्हणून इंग्रजी विषयाचे प्रा. दिलीप मनवर हे होते. तसेच उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, उपप्राचार्य डॉ. रवी प्रधान व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी प्राध्यापक संभाजी तिडके आपल्या मनोगतात म्हणाले, देश एकसंघ व्हावा वंचित घटक महिला सर्व समाजघटकांची चांगल्या पद्धतीने प्रगती व्हावी, जगातल्या सर्व मानव समाजाने माणसाला माणसासारखे वागवावे ही विचारसरणी बाबासाहेबांची होती ती पूर्ण व्हावी.

प्रा. दिलीप मनोहर याप्रसंगी म्हणाले, बाबासाहेबांनी आयुष्यभर आपल्या लेखणीमधून, व्याख्यानांमधून भारतीय समाजालाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला प्रकाशमान करण्याचा प्रयत्न केला. खरोखर आजच्या दिनी आत्मचिंतन करण्याची गरज आहे की खरोखर तो प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचला का? आणि पोहोचला असेल तर आचरणात किती आला? विचारांशिवाय विचारांमध्ये बदल नाहीत. विचार पोहोचेलच पाहिजे; परंतु त्या विचारांचे रूपांतर आचरणामध्ये, कृतीमध्ये झाल पाहिजे, पण ते झालेले दिसत नाही.



शेतीच्या संबंधाने ते पुढे म्हणाले, शेतीवर आधारित उद्योगधंदे यांची निर्मिती व्हायला पाहिजे. शेतीच्या बी-बियाणे, खते यावर सबसिडी मिळाली पाहिजे. संकटसमयी आर्थिक मदत शेतकऱ्यांना केली पाहिजे. त्याचबरोबर शेतीचे राष्ट्रीयीकरण केले पाहिजे, असे विचार बाबासाहेबांनी मांडले आहेत. म्हणजेच बाबासाहेबंनी सर्वच क्षेत्रांचा विचार केलेला आहे. बाबासाहेब हे केवळ दलितांचेच उद्धारकर्ते नव्हते. दलितांचा त्यांनी उद्धार केलाच; पण त्याचबरोबर त्यांनी सर्वच क्षेत्रांत अतिशय महत्त्वाचे काम केलेले आहे. बाबासाहेब मानवी हक्कांचे कट्टर पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्याबद्दलची त्यांची धारणा अशी होती की, ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळवायचे एवढाच मर्यादित अर्थ त्याचा नव्हता तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांवर आधारित जातीविरहित, वर्गविरहित आणि लोकशाहीप्रणित नवसमाजनिर्मिती करणे हा बाबासाहेबांचा ध्यास होता. आज खरंच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वावरची जातीविरहित, वर्गविरहित आणि लोकशाहीप्रणित नवसमाजनिर्मिती आपण करू शकलो का? याचे उत्तर दुर्दैवाने नकारात्मक आहे.

ते म्हणाले की, समाजामध्ये सगळ्या प्रकारची भयानक विषमता असता

कामा नये. ज्याला विशेषाधिकार आहे तो आणि जो केवळ ओझ्याचा बैल आहे असे समाजामध्ये वर्ग असता कामा नये. आज जरी समाजामध्ये जात जरी सुप्त स्वरूपात दिसत असली तरी वर्ग आता मोठ्या प्रमाणात उघड दिसत आहेत. हे वर्ग म्हणजे भांडवलदार आणि कामगार वर्ग होत. ही वर्गविरहित समाजरचना बाबासाहेबांना अपेक्षित होती; पण ते दुर्दैवाने आपण निर्माण करू शकलो नाहीत.

बाबासाहेब लोकशाहीची व्याख्या करताना म्हणाले होते की, रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात. शांततापूर्ण मार्गाने सामाजिक आणि आर्थिक बदल व्हावेत हे त्यांना अपेक्षित होते.

शिक्षणाविषयी बाबासाहेबांचे विचार असे होते की, शिक्षणातून समाजाची नैतिक आणि सामाजिक उन्नती होते. सामाजिक दुःख निवारणासाठी समाजातील प्रत्येक घटक सुशिक्षित असला पाहिजे. म्हणून त्यांनी शिक्षणामध्ये नैतिक मूल्यांचा जास्त आग्रह धरला होता. समाजाची अधोगती अज्ञानामुळे होते. शिक्षणामुळे अज्ञान दूर होईल, अहंकार लोप पावेल. ही शिक्षणाबद्दलची बाबासाहेबांची भूमिका अतिशय सकारात्मक असल्याचे पाहायला मिळते. पुढे म्हणतात की, आमच्या सामाजिक दुःखावर उच्च शिक्षण हेच सर्वश्रेष्ठ औषध आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. भारत खंदारे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, बाबासाहेबांचे कार्य सर्वच क्षेत्रात आपणास पाहायला मिळते. आयुष्यभर बाबासाहेबांनी मानवतेसाठी कार्य केलेले आहे. लोकशाही प्रबळ झाली पाहिजे, हे त्यांचे महत्त्वाचे कार्य. त्यांना समाजवादी समाजरचना अपेक्षित होती.

बाबासाहेबांनी शिक्षणाला महत्त्व दिले. त्यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असे सांगितले पण आज आपण शिकलो, संघटित झालोत का? संघर्ष किती करतो? हासुद्धा प्रश्न आपल्यापुढे निर्माण झालेला आहे. बाबासाहेबांनी केलेले कार्य आपण आपल्या जीवनात आचरणात आणले पाहिजे. आपण सर्वांनी ज्या थोर पुरुषांनी जे विचार दिले आहेत त्या विचाराने वागणे आज अत्यंत आवश्यक आहे. त्यातूनच समाज आणि देश लोकशाहीप्रधान होईल.

समारोप करताना उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव म्हणाले, बाबासाहेबांचे चरित्र हे सर्वांसाठी खुले आहे. महापुरुषांचे विचार आत्मसात करून त्यांचे अनुकरण करून त्यांचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपण आपल्या जीवनामध्ये बदल करायचा असतो आणि असे विचार आपल्यात रुजवायचे असतात.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ. एस. पी. टकले यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**प्रत्येक व्यक्तीला निर्भय होण्याचा संदेश वेदांत देतो. सामर्थ्य हे पुण्य आहे. दुर्बलता हे पाप आहे.**

**एखाद्या बाँबगोळ्याप्रमाणे अज्ञान राशीवर आदळणारा उपनिषदांतील शब्द आहे, 'अभी:' म्हणजे निर्भयता. म्हणजेच अध्यात्मिक सामर्थ्य. कशाचेही भय बाळगू नका तरच तुमच्या हातून पूर्ण कार्य होऊ शकते.**

**ज्या क्षणी तुम्ही भयभीत व्हाल त्याच क्षणी तुमची शक्ती नष्ट होऊन दुर्गति सुरू होईल. म्हणून ''उठा जागे व्हा व ध्येय प्राप्त केल्याविना थांबू नका.''**

**– स्वामी विवेकानंद**

# महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा

दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी लाल बहादूर शास्त्र महाविद्यालय व तालुका विधी सेवा समिति परतूर व वकील संघ व वकील संघ परतूर यांचे संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन व मा जिजाऊ जन्मोत्सवानिमित्ताने कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती पूजा कोकाटे (दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर परतूर तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती परतूर) या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे व श्री. एम. एस. भरड (सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, परतूर) हे उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. पुरुषोत्तम वायाळ हे लाभले होते.

यावेळी डॉ. वायाळ म्हणाले, कुठलीही इमारत उभी राहायची असेल तर त्याचा पाया मजबूत असणे आवश्यक आहेत. तो पाया मग तो इमारतीचा असू द्या, कुटुंबाचा असू द्या, समाजाचा असू द्या, देशाचा असू द्या किंवा विश्वाचा असू द्या. हा पाया म्हणजेच युवा. पाया म्हणजेच तरुण पिढी आणि आज किती गौरवाची गोष्ट आहे.

जगाला मार्गदर्शन करणारे मॅनेजमेंट गुरू छत्रपती शिवाजी महाराज, माँ जिजाऊंनी जन्माला घातले. त्यांच्या संकल्पाने त्यावेळी प्रतिकूल असणाऱ्या परिस्थितीमध्ये मोगल साम्राज्याचा सामना करून हिंदवी स्वराज्याची स्थापना करून रयतेचे रक्षण करण्यासाठी माझ्या शिवाजी राजाने जिम्मेदारी घ्यावी आणि रयतेचे राज्य स्थापन करावे. हा एक संकल्पाचा विचार त्यांना गर्भधारणा झाली त्यावेळी त्यांच्या मनामध्ये आला आणि त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम आपण इतिहासामधून वाचलेत, पाहिलेत, ऐकत आहे आणि आज जयंती-पुण्यतिथीच्या निमित्ताने आजची ऊर्जा आणि प्रेरणा आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आणि त्यांचा मावळा होण्यासाठी प्रेरित करीत आहे. आज माँ जिजाऊ यांना अभिप्रेत असलेला शिवाजी होता. आज सगळ्या भारतातल्या माऊल्यांना शिवाजी महाराजांसारखा पुत्र पाहिजे.

तसेच सर्व जगाला अध्यात्माची ओळख करून देणारे व्यक्तिमत्त्व स्वामी विवेकानंद ज्यांना युवकांचे प्रेरणास्थान मानले जाते. प्रत्येक वेळी त्यांच्या विचारांमध्ये एकच केंद्रस्थान होते, ते म्हणजे युवा. युवा जर सशक्त बनला, निरोगी बनला, जिमेदार बनला, शक्तिशाली, प्रभावशाली जर बनला तर त्या देशाची प्रगती कोणीही थांबवू शकत नाही. म्हणून सातत्याने स्वामी विवेकानंदांनी युवकांना केंद्रस्थानी ठेवून त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे आणि म्हणूनच भारत सरकारने स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याचा संकल्प केला आहे आणि त्याच निमित्ताने आज हा फार दुग्धशर्करा योग आज कायदेविषयक शिबीर, माँ जिजाऊ यांची जयंती, स्वामी विवेकानंदांची जयंती हा योग चांगला आहे. यानिमित्ताने मला युवकांना एवढेच आवाहन करायचे आहे. जर तुम्हाला स्वतःची प्रगती करायची असेल, तुमच्या कुटुंबासाठी तुम्हाला काही देणे द्यायचे असेल, पर्यावरण-निसर्ग, प्रकृती या सगळ्यांना तुम्हाला देणे द्यायचे असेल आणि देशासाठी काही योगदान द्यायचे असेल तर अगोदर तुम्हाला स्वतःचे आत्मपरीक्षण करून स्वतःला सशक्त निरोगी जिम्मेदार आणि आत्मविश्वासी बनवणे अत्यंत आवश्यक आहे. असा युवा स्वामी विवेकानंदांना अपेक्षित आहे. आजच्या युवकांमध्ये आलेली मरगळ, आरोग्याकडे असलेले दुर्लक्ष, व्यसनाधीनता, नकारात्मकता, नशिबाला दोष देणे यातून जे मनोविकार आज आपण समाजामध्ये पाहतोय याचे प्रमाण आज सगळ्यात जास्त युवकांमध्ये आपण पहातोय. सगळ्यात जास्त मानसिक विकार युवक आणि युवतीमध्ये आज दिसतात. मनाविरुद्ध एखादीही गोष्ट घडली तर युवक-युवती स्वतःला आवरू शकत नाहीत. त्या स्वतःच्या मनावर ताबा ठेवू शकत नाहीत. अशी परिस्थिती

आज युवक-युवतींच्या बाबतीत झालेली आहे. कुटुंबातील एका सदस्यामुळे सर्व कुटुंब चिंताक्रांत आहे. कुटुंबेच्या कुटुंबे तणावाखाली आज वावरताना दिसत आहेत. जोपर्यंत हे बदलत नाही तोपर्यंत समाज सशक्त होणार नाही असे ते म्हणाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, ज्यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले अशा माँ जिजाऊंनी अठरापगड मावळ्यांना शिवबासोबत घेऊन रयतेचे राज्य निर्माण करण्याचे काम या ठिकाणी केले. प्रत्येक मावळ्यांमध्ये शिवबा घडवला अज्ञान, अंधश्रद्धा, अन्याय, रूढी-परंपरा यांच्या जोखडातून रयतेचे सुंदर राज्य कसे असते अशा प्रकारचा आदर्श जिजाऊंनी घालून दिला आहे. आज आपण तोच आदर्श घेऊन मार्गक्रमण करीत आहोत.

तसेच युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद त्यांचे नाव घेतल्यावर छाती भरून येते. त्यांनी जे काम केलेले आहे, यासंदर्भात बोलले जाते की, एकोणीसशे वर्षे पुरेल एवढे त्यांचे कार्य आहे. त्यांनी जो संदेश दिलेला आहे, उठा जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका. आजच्या युवकांना जे ध्येय गाठायचे आहे त्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले पाहिजे. युवकांना स्वतःमधला न्यूनगंड घालावयाचा असेल तर वाईट गोष्टी, नकारात्मकता असतील तर त्या टाकून दिल्या पाहिजेत. त्यातूनच स्वतःची, समाजाची आणि देशाची प्रगती होईल, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात श्रीमती पूजा एन. कोकाटे म्हणाल्या, स्वामी विवेकानंदांच्या कार्याची पोहोचपावती म्हणून आपण राष्ट्रीय युवा दिन साजरा करतो. त्यांच्या विचारांची जोपासना सर्व युवांनी करावी, असे मी युवकांना आवाहन करते.

महाराष्ट्राच्या छातीमध्ये जी गुलामगिरीची पहार होती ती काढून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मनामध्ये स्वराज्याची प्रेरणा निर्माण केली, स्वराज्याचे स्वप्न त्यांनी पाहिले ते आपल्या शिवबामध्ये त्यांनी जोपासले. ती संकल्पना वृद्धिंगत केली. या अशा महापुरुषाला जन्म देणाऱ्या, स्वराज्याच्या महासंकल्पनेला जन्म देणाऱ्या जिजाऊमाता यांचा जन्मदिवस. त्यांचे स्वराज्य वृद्धिंगत करण्याचे विचार तसेच गुलामगिरीच्या जोखडामधून बाहेर पडण्याचे विचार आपण जोपासावेत तरच खऱ्या अर्थाने आजच्या या कार्यक्रमाचे साध्य होईल.


गरिबीनिर्मूलन या योजनेतून आर्थिकदृष्ट्या दुर्बल, सामाजिकदृष्ट्या जे दुर्बल आहेत. ज्यांची कायदेविषयक असोत किंवा इतर गोष्टी जसे शिक्षण, इतर अधिकार, समाजामध्ये राहण्याचा अधिकार, दोन वेळचे जेवण मिळण्याची भ्रांत आहे, या स्वरूपाची त्यांची कुचंबणा होत आहे, अशा लोकांसाठी असणाऱ्या योजना राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने या योजना आखून दिलेल्या आहेत. या योजनेअंतर्गत राज्य शासनाने तसेच केंद्र शासनाने काही गरिबी हटाव योजना सुरू केलेल्या आहेत. या योजनांची एक यादी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठवणे राज्य शासनाला बंधनकारक आहे. त्यानंतर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने गरिबी हटाव योजनेअंतर्गत ज्या कोणत्या योजना आहेत त्यांचा तालुका विधी सेवा प्राधिकरणामार्फत प्रसार-प्रचार करावयाचा आहे. या योजनांचा प्रसार प्रचार युवा पिढीने करावा, असे त्यांनी आवाहन केले आहे.

गरिबांसाठी कोणकोणत्या योजना आहेत हे त्यांना समजावे. समाजातील दुर्बल घटकांचा विकास व्हावा, कोणत्याही योजनेपासून लाभार्थी वंचित राहू नये हा हेतू यामागे आहे, असे त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. आर. एल. पाईकराव यांनी केले. तसेच सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक पाठक यांनी केले. याप्रसंगी श्री. ए. जी. चव्हाण, श्री. एम. आर. सोळंके, आर. एल. पाईकराव तसेच महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. तळेकर, डॉ. टकले, सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदरील कार्यक्रम हा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला. यासाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. श्रीमंत सुरवसे, प्रा. रिंढे यांचे तंत्रसाहाय्य लाभले.

# मराठी राजभाषा दिन साजरा

दि. २ मार्च, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताचे औचित्य साधून 'मराठी भाषा आणि आपण' या विषयावर कार्यक्रमाचे आयेजन करण्यात आले. या कार्यक्रमास व्याख्याते म्हणून कवी, समीक्षक, डॉ. शशिकांत पाटील, मराठी विभाग प्रमुख, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी हे लाभले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे हे लाभले.




यावेळी बोलताना डॉ. शशिकांत पाटील म्हणाले, मराठी भाषा संपणार नाही, ती बुडणार नाही, ती थांबणार नाही. मराठी भाषेचा वारसा आहे तो २२०० वर्षांपासूनचा समृद्ध वारसा आहे. तत्पूर्वी ती मराठी भाषा काय असेल याची जाणीव आपणास होते. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळावा यासाठीचा जो जो निकष आहे तो २००० वर्षांपूर्वीचा साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा त्या भाषेला असावा, तिचा ज्ञान भाषेमध्ये वापर व्हावा असे चार ते पाच निकष पूर्ण करते; परंतु केंद्र सरकारची वक्रदृष्टी, राजकारण यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होत नाही.

अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होऊन काय होणार? तर ज्ञानकोशात त्याचा समृद्ध वारसा जतन होणार, वेगवेगळ्या योजनेच्या अधिपत्याखाली, भाषा संचालनालयाच्या माध्यमातून मराठी भाषा अजून पुन्हा समृद्धतेच्या वाटचालीकडे चालेल. म्हणजे विश्वकोशाची निर्मिती, ज्ञानकोशाची निर्मिती आहे किंवा जेवढे काही ज्ञान विषय आहेत तेवढे फक्त मराठीतच शिकविल्या जातील. म्हणजे अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर बऱ्याच गोष्टी घडणार आहेत.

मराठी भाषेच्या अनुषंगाने आपण जेव्हा विचार करायला लागतो तेव्हा जगभरात ६००० भाषा बोलल्या जातात. भारतात त्यातील प्रमुख २२ भाषा आहेत. लोकसंख्येच्या अनुषंगाने मराठी भाषा बोलणाऱ्यांची जी संख्या आहे ती जगाच्या पातळीवर चौथ्या क्रमांकाची संख्या आहे.

ते पुढे म्हणाले, ज्ञान शाखांचा आज आपण विचार केला तर संगणकाच्या माध्यमातूनही फार मोठ्या प्रमाणात मराठी भाषेचा वापर होताना दिसतो. या सर्व गोष्टींचा आपण विचार केला तर गणेश देवींनी बोलीभाषेचा जो अभ्यास केला होता त्यानुसार ११०० बोलीभाषा आज जिवंत आहेत.

मराठी भाषेच्या समृद्ध वारशाचा आपण विचार करत पाठीमागे जायला लागलो तर ११ व्या शतकात

अंबेजोगाईत जो विवेकसिंधू हा आद्य ग्रंथ कवी मुकुंदराजांनी निर्माण केला आहे तो अतिशय उत्तम उदाहरण म्हणून मराठी भाषेच्या चांगल्या ग्रंथातील दिले जाते. महानुभाव संप्रदायातील ७ ग्रंथांचा म्हणजेच लिळाचरित्र, गोविंदप्रभू चरित्र, सूत्रपाठ, रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध असेल यासारखे चांगले गणले जाणारे जे ग्रंथ आहेत ते ७ ग्रंथ महानुभाव साहित्यामध्ये निर्माण झाले आहे. शके १२७२ मध्ये ज्ञानेश्वरीची निर्मिती झालेली आहे ती ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत केली आहे. भांडारकर ग्रंथालयामध्येही ३०,००० लेखी पोथ्या मराठी भाषेमध्ये आहेत. अशी प्रचंड मोठी निर्मिती मराठी भाषेच्या वारशाच्या निमित्ताने बघायला मिळते.

मराठी भाषेवर प्रचंड प्रमाणात आक्रमणे झाली. जसजशी सत्ता आक्रमणे झाली तसतशी भाषेचीही आक्रमणे झाली. पोर्तुगीज आले पोर्तुगीज भाषा आली, डच आले डच भाषेचे आक्रमण, मोगलांची भाषा, निजामकालीन भाषा, उर्दू भाषा, फार्सी भाषा, अरबी भाषा अशा कितीतरी भाषांची आक्रमणे मराठी भाषेवर झालीत, तरीही मराठी भाषा मूळ रूप आहे ते बदलवून परकीय भाषेला सामावून स्वतःचे अस्तित्व टिकवून आहे.

कालखंडानुरूप भाषा वेगळी आहे. बखरीतील भाषा वेगळी आहे आणि आजची मराठी भाषा वेगळी आहे. आज आपण तिच्याकडे बघितले तर तिचे रूप खूप बदललेले आहे. भाषा ही प्रवाही असते. उदाहरणार्थ एखादी नदी प्रवाही आहे तोपर्यंत निथळ आहे. डोंगरदऱ्यातून वेगवेगळे प्रवाह, झरे येऊन तिला मिळतात. ती पुन्हा प्रवास करते. काही काळ गढूळ होऊन पुन्हा तिचा निथळ प्रवास सुरू होतो. हा जो प्रवास आहे तो मराठी भाषेने स्वीकारलेला आहे. पोर्तुगीज, डच, अरबी, फारसी, उर्दू अशा अनेक भाषांची संमिश्रता मराठी भाषेत येत गेली; पण मराठी भाषेने तिचे प्रवाहीपण सोडले नाही. प्रत्येक भाषेतील शब्द तिने आत्मसात करत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत गेली. जे पाणी थांबते ते गढूळ असते. तिथे शेवाळ निर्माण होते. त्याची दुर्गंधी यायला लागते. ते पाणी कालांतराने सुकून जाते. मराठी भाषेने तसे केले नाही. स्वतःचे साचलेपण निर्माण होऊ दिले नाही. म्हणून आपणास ९ व्या शतकातील भाषा म्हणजे ९३४ चा अक्षीचा शिलालेख बघितला तर चांगला मराठीतील ग्रंथ तयार होईल, अशी समृद्धता मराठी भाषेची आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. भारत खंदारे कार्यक्रमाचा समारोप करताना म्हणाले, मराठी भाषेचा गोडवा संत साहित्यातून आपणास अनुभवास येतो. २२०० वर्षांपूर्वीची भाषा आहे. या भाषेचे महत्त्व बघितले तर ती भाषा अत्यंत समृद्ध गुणवान भाषा आहे. आपण दिवसाची सुरुवात करताना सकाळी एखादा अभंग ऐकला तर माणूस मंत्रमुग्ध होतो. ताणतणाव विसरून जातो. प्रसन्न वाटायला लागते. एवढी मोठी ताकद मराठी भाषेच्या शब्दांमध्ये आहे. मराठी भाषिक, संत, पंत, तंत, कवी, लेखक, नाटककार अशा अनेक थोरामोठ्यांनी भाषा समृद्ध केली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख व मराठी भाषा संशोधान केंद्राचे संचालक डॉ. अशोक पाठक यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. सुधाकर बोथीकर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. रवींद्र गायके यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यपकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक महिला दिन साजरा

दि. ८ मार्च२०२२ रोजी येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास श्रीमती अर्चना तनपुरे आणि डॉ. अंजली अंभोरे या प्रमुख वक्त्या म्हणून लाभल्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे होते. व्यासपीठावर याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी प्रधान, उपप्राचार्य अशोक खरात, महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. वैशाली चौधरी उपस्थित होत्या.

याप्रसंगी इयत्ता अकरावीतील वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थिनींचा जे. ई. एफ. शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून बक्षीस देण्यात आले. त्यात वैष्णवी गोरे, किरण साबळे, वैष्णवी निंबाळकर, प्रिया झोरे, वनिता सराटे, आयेशा अन्सारी, पूजा भोसले आदींचा महिला दिनाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ग्रंथपाल डॉ. वैशाली चौधरी म्हणाल्या, आयुष्यात स्त्रीला अनेक नाती जोपासावी लागतात. प्रत्येक कुटुंबाचा आधारस्तंभ स्त्रीच असते. स्त्री आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून जिवाचे रान करते. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते. आज प्रत्येक क्षेत्रात प्रगतिपथावर स्त्री आहे; पण तरीही स्त्रियांना अनेक संकटांना सामोरे जावेच लागते.

पुढे त्या म्हणाले, आजच्या स्त्रीने आत्मनिर्भर बनले पाहिजे आणि निर्भयपणे संकटांचा सामना केला पाहिजे. कारण पुढची पिढी कशी घडवायची हे स्त्रियांच्या हातात आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे सर्वात मोठे उद्दिष्ट म्हणजे स्त्री आणि पुरुषांमध्ये समानता




निर्माण करण्यासाठी जागरूकता आणणे तसेच महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे होय.

आज पुरुषांबरोबर स्त्रियादेखील सर्वच क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी बजावत आहेत; परंतु आज देखील स्त्री सुरक्षित नाही हे खेदाने बोलावे लागते. लैंगिक शोषण, अत्याचार, हुंडाबळी, भ्रूणहत्या या गोष्टींमुळे स्त्रियांच्या, मुलींच्या मनात भीतीची असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मुलीचा जन्म झाल्यावर तिचा तिरस्कार घरातच केला जातो. स्त्रियांचा अपमान केला जातो. स्त्री-पुरुष समानता ही आचरणात आणायला हवी. स्त्री सन्मानाची सुरुवात आपण आपल्या घरापासूनच करायला हवी तरच आपला देश सुरक्षित सक्षम आणि बलवान होईल.

याप्रसंगी प्रमुख वक्त्या डॉ. अंजली आंभोरे म्हणाल्या, प्रत्येक स्त्री ही खास असते मग ती घरात असो किंवा ऑफिसमध्ये. एक काळ असा होता की, महिलांना घरात कोंडून ठेवलं जात होतं, घराबाहेर पडण्याची परवानगी नव्हती. घरगुती काम हेच त्यांचे क्षेत्र होते; पण आजच्या समाजात अनेक सकारात्मक

बदल झाले आहेत.

महिला दिनासारख्या उत्सवामुळे महिलांना त्यांच्या शक्तीची जाणीव होऊ लागली आहे. आजच्या महिला आता स्वतंत्र आणि स्वावलंबी झाल्या आहेत. घर आणि समाजाच्या भल्यासाठी स्त्री-पुरुष दोघांचेही समान योगदान आहे, हे आपण स्वीकारले पाहिजे.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या दुसऱ्या वक्त्या श्रीमती अर्चना तनपुरे म्हणाल्या, जगातील विविध क्षेत्रांत महिलांच्या योगदानाचा गौरव करून ८ मार्च रोजी महिला दिन साजरा केला जातो. जगभरात साजऱ्या होणाऱ्या या दिवसाचे महत्त्व वर्षानुवर्षे वाढत आहे.

आजच्या स्त्रिया स्वावलंबी असून समाजाच्या व देशाच्या विकासासाठी त्यांचे मोठे योगदान आहे आणि ते नेहमीच करत आले आहेत. प्रत्येक स्त्री तितकीच महत्त्वाची आहे, मग ती नोकरी करणारी स्त्री असो किंवा आपल्या कुटुंबाची आणि मुलांची काळजी घेणारी स्त्री; पण त्यांचे मोठे योगदान मान्य करूनही पुरुषांच्या तुलनेत महिलांना मध्यम दर्जाचे स्थान दिले जाते, हे कटू सत्य आहे. अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. भारत खंदारे म्हणाले, आजही महिला सक्षमीकरण आवश्यक आहे. कारण आजही खेड्यात मुलींना शिक्षण मिळत नाही. लहान वयातच त्यांची लग्ने होतात व स्त्री भ्रूण हत्येसारखी समस्या अजूनही आहे.

झाशीची राणी लक्ष्मीबाई, इंदिरा गांधी, प्रतिभा पाटील, लता मंगेशकर, मदर तेरेसा, अरुणिमा सिन्हा यांसारख्या अनेक महिलांनी दाखवून दिले आहे की, स्त्रिया कमकुवत नसतात; पण आजही अनेक महिलांना केवळ स्त्री आहे म्हणून घराबाहेर पडू दिले जात नाही.

आपण सर्वांनी या विशेष दिवसापुरतेच महिलांचा आदर आणि कौतुक मर्यादित ठेवू नये, कारण प्रत्येक दिवस हा मानवतेचा उत्सव आहे. जिथे महिलांची भूमिका महत्त्वाची आहे, स्त्रिया या मानवतेचा केंद्रबिंदू आहे, असा आशावाद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधाकर यांनी केले तर आभार डॉ. नितीन माने यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी, सहकारी, महिला, विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.

## उत्साही राहा

कोणतेही काम नेटाने, नियोजनपूर्वक योग्य वेळेत परिपूर्ण तेव्हाच होते, जेव्हा तुमच्या अंगात उत्साहरूपी भूत संचारलेले असते. हा उत्साह ऊर्जेत रूपांतरित होत असतो. उत्साह वाढविण्यासाठी शारीरिक, मानसिक, शिस्त पाळली पाहिजे. योग्य आहार आणि आवश्यक तेवढी विश्रांती यांची बेरीज जमली की, तुम्ही सदैव उत्साहाने सळसळत राहता. उत्साहाची सळसळ तारूण्याचे लक्षण आहे. काही-काही वृद्ध हे शिस्तीतील गणित सांभाळल्याने तरूणांसारखे उत्साही दिसतात. तुम्हाला यशांची नवनवी शिखरे गाठायची असतील तर उत्साहाचा हा कानमंत्र तुम्ही घेतलाच पाहिजे.

## आत्मविश्वास वाढवा

आत्मविश्वास तुम्हाला यशापर्यंत पोहोचवतो. स्वतःबद्दलचा विश्वास म्हणजे आत्मविश्वास. आत्मविश्वास बहुतेक सगळ्यांमध्ये असतो; पण तो जाणीवपूर्वक वाढवणे महत्वाचे आहे. ''प्रचंड आत्मविश्वास असलेल्या माणसाजवळ धाडसी वृत्ती असतेच.'' आत्मविश्वासामुळे तुम्हाला प्रत्येक काम करणे सहज शक्य होते. तसेच आत्मविश्वासामुळे तुमची धाडसी वृत्तीही वाढते.

# महाविद्यालयात लसीकरण शिबीर उत्साहात संपन्न

दि. २७ ऑक्टोर २०२१ रोजी लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अभ्यास केंद्रमार्फत मिशन युवा स्वास्थ्य अंतर्गत कोव्हसिन लसीकरण कार्यक्रम यशस्वी पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. कपिल भैया आकात यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्ञानदेव नवल (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, परतूर), न्यायमूर्ती महेश भरड (दिवाणी न्यायलय, परतूर)

डॉ. दीपक तारे (नोडल अधिकारी लसीकरण ग्रा. रुग्णालय, परतूर) डॉ. सारिका जाधव (ग्रा. रुग्णालय, परतूर)

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत खंदारे, उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, उपप्राचार्य डॉ. रवी प्रधान, उपप्राचार्य संभाजी तिडके, यशवंतराज चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक डॉ. राजेंद्र फासे याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल कुलकर्णी, डॉ. राजेश सुसर, प्रा. रामेश्वर वायाळ सहकार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन माने उपस्थित होते.

याप्रसंगी वैद्यकीय रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. या लसीकरण शिबिरास विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. एकूण ९३ व्यक्तींना लस देण्यात आली.

या लसीकरण कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबीर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. दशरथ देवडे, प्रा. बिडवे, डॉ. सुरवसे, प्रा. गंगावणे, श्री. प्रभाकर सुरुंग, सहायक ग्रंथपाल श्री. केशव बरकुले, प्रा. गाते, प्रा. टकले, वरिष्ठ लिपिक श्री. काटे आदींसह महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रगतीत अडथळा ठरणाऱ्या विचारांना दूर ठेवा

व्यर्थ चिंता, गॉसीप, क्षुल्लक मतभेद इत्यादी गोष्टी तुमच्या प्रयत्नांची गती कमी करतात. पर्यायाने तुमच्या प्रगतीमध्ये अडथळा निर्माण होतो.

''प्रगतीचा आलेख योग्य गतीने सतत वर-वर जाणारा असावा.'' कधी वर, कधी खाली जाणारा आलेख प्रगती दर्शविणारा नसतो.

व्यर्थ चिंता करून प्रश्न सुटत नसतात, गॉसीपमुळे तुमच्या ज्ञानात वाढ होणर नसते. क्षुल्लक मतभेदामुळे ताण वाढतो. मग अशा गोष्टींना उगीच महत्व देऊन प्रगतीत अडथळा बनवू नका. प्रगतीचा आलेख सातत्याने वर जाणारा कसा राहील याची दक्षता घ्या.



# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल : २०२१-२२

दि. २१ जून २०२१, रविवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त मार्गदर्शक योग गुरू डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी सर्वांना योगाचे महत्त्व सांगून उपस्थित सर्वांकडून योगा करून घेतला. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी होते.

दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी स्वतंत्र दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त परिसर स्वच्छता करून अल्पोपहार देण्यात आला.

दि. २३ ऑगस्ट २०२१ रोजी विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. मनवर सरांनी मार्गदर्शन केले, तर प्रा. पाठक यांनी विद्यापीठ गीताचे गायन केले.

दि. १२ सप्टेंबर २०२१, शनिवार रोजी महाविद्यालयात वृक्षारोपण केले. या प्रसंग मा. प्राचार्य सदाशिव मुळे, उपप्राचार्य सुधाकर जाधव, उपप्राचार्य रवि प्रधान व प्रा. सतीश उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी प्रा. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व नंतर अल्पोपहार दिला.

दि. २४ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त प्राचार्य मुळे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. उपस्थित विद्यार्थ्यांना उपप्राचार्य डॉ. रवि प्रधान यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. कुलकर्णी यांनी केले तर प्रा. सुसर यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी अल्पोपहार व चहा दिला.

दि. २ ऑक्टोबर २०२१ रोजी लाल बहादूर शास्त्री व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी प्रा. टकले एस. पी. यांचे समयोचित भाषण झाले. त्यानंतर कॉलेज परिसर स्वच्छ केला नंतर अल्पोपहार दिला.

दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा करून ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य सदाशिव मुळे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनविषयीचे महत्त्व सांगितले.

दि. २७ ऑक्टोबर २०२१ रोजी दक्षता जनजागृती सप्ताहनिमित्त प्राचार्य सदाशिव मुळे यांच्या अध्यक्षतेमध्ये भ्रष्टाचार निर्मूलनाच्या विषयी कार्यक्रम घेतला. या प्रसंगी प्रा. पाठक यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाचे शपथेचे वाचन करून घेतले. कार्यक्रमानंतर सर्वांना अल्पोपहार दिला.

दि. २५ नोव्हेंबर २०२१ रोजी कोविड-१९ आणि यासंबंधी घ्यावयाची दक्षता याविषयी प्रा. एस. डी. तळेकर सरांचे मार्गदर्शन सर्व विद्यार्थ्यांना व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सदाशिव मुळे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव व उपप्राचार्य रवि प्रधान हे होते. कार्यक्रम अधिकरी प्रा. सुसर यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना आयोजित संविधान दिन साजरा करण्यात आला.

त्याप्रसंगी सामूहिक संविधान प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तर प्रा. मनवर यांनी संविधानाविषयी मार्गदर्शन केले, प्रा. मुजमुले यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. कुलकर्णी यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमानंतर अल्पोपहार दिला.

दि. २९ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्याप्रसंगी शिबिराचे उद्‌घाटन मा. श्री. कुणाल आकात (उपाध्यक्ष, मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतूर) यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य सदाशिव मुळे, उपप्राचार्य सुधाकर जाधव, उपप्राचार्य डॉ. रवि प्रधान, उपप्राचार्य संभाजी तिडके, प्रतिष्ठित नागरिक श्री. राखे नाना, पत्रकार श्री. शेषराव वायाळ उपस्थित होते. याप्रसंगी बऱ्याच कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक दायित्व पूर्ण केले.

दि. १२ जानेवारी २०२२ राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य सदाशिव मुळे हे होते तर प्रा. डॉ. पांडुरंग नवल यांचे यानिमित्त व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बिडवे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. एस. पी. टकले यांनी केले.

दि. १४ जानेवारी २०२२ महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा केला. कार्यक्रमानंतर महाविद्यालय परिसर स्वच्छता केली व नंतर अल्पोपहार दिला.

दि. २३ फेब्रुवारी २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य सदाशिव मुळे व प्रमुख पाहुणे प्रा. दुबाले यांच्या हस्ते गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. दुबाले सरांनी गाडगेबाबांविषयी विस्तारपूर्वक माहिती सांगितली. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी, स्वयंसेवक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. सुसर यांनी आभार प्रदर्शन केले.

दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त प्रा. डॉ. श्रीमंत राऊत (शारदा निकेतन महाविद्याल, नांदेड) यांचे ऑनलाईन मार्गदर्शन झाले. मुलांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होणे अतिशय आवश्यक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

दि. ८ मार्च २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सदाशिव मुळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. श्रीमती चौधरी मॅडम, प्रा. डॉ. दक्षता देशमुख मॅडम व दळवी मॅडम होत्या. याप्रसंगी ॲड. ऐश्वर्या तनपुरे यांचे व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमास उपप्राचार्य सुधाकर जाधव, डॉ. रवि प्रधान व उपप्राचार्य संभाजी तिडके व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुसर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. कुलकर्णी यांनी केले.

दि. १२ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात मा. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सदाशिव मुळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा. सुधाकर जाधव हे होते. याप्रसंगी जाधव सरांनी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य रवि प्रधान, कार्यक्रमाधिकारी प्रा. कुलकर्णी, प्रा. सुसर, प्रा. फासे इत्यादी उपस्थित होते.